# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१९

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक २१ जून, २०१९ / ज्येष्ठ ३१, १९४१ ( शके )**

**(१) महसूल, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री**
**(२) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री**
**(३) मदत व पुनर्वसन मंत्री**
**(४) पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री**
**(५) फलोत्पादन मंत्री**
**(६) कृषी मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ८६**

---

### मुंबई व उपनगरातील रुग्णालयांमध्ये अॅन्टीरेबीज लस उपलब्ध नसल्याबाबत

**(१) * १३६९१३ श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरात भटक्या कुत्र्यांनी नागरिकांवर हल्ला करण्याचे प्रमाण वाढत असून श्वानदंश झालेल्या व्यक्तींना दिल्या जाणाऱ्या अॅन्टीरेबीज लसीचा पुरवठा करणा-या कंत्राटदारांनी पुरवठा थांबविल्यामुळे उपनगरीय रुग्णालयांमध्ये अॅन्टीरेबीज लसींचा तुटवडा निर्माण झाला असल्याचे दिनांक १९ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई व उपनगरीय रुग्णालयांमध्ये ॲन्टीरेबीज लस पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्याने रुग्णांना ही लस खासगी रुग्णालयांतून खरेदी करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार मुंबई व उपनगरीय रुग्णालयांमध्ये पुरेशा प्रमाणात ॲन्टीरेबीज लस उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ॲन्टीरेबीज लसीचा पुरवठा करणाऱ्या कंत्राटदाराने पुरवठा थांबविल्यामुळे उपनगरीय रुग्णालयांमध्ये ॲन्टीरेबीज लसीचा तुटवडा निर्माण झाला ही बाब खरी नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(२), (३), (४) व (५) बृहन्मुंबई महानगरपालिकेस मे. भारत बायोटेक या कंपनीमार्फत दोन वर्षांपासून ॲन्टीरेबीज लसीचा पुरवठा नियमितपणे करण्यात येतो.

दिनांक १० ते २० जानेवारी, २०१९ दरम्यान सदर लस पुरवठा करण्यास कंपनीकडून विलंब झाला. तथापि ॲन्टीरेबीज लस प्रत्येक केंद्रात पुरेशा प्रमाणात उपलब्ध असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

-----------------

## पुणे शहरातील सहकारनगर व पर्वती येथील शासकीय भूखंडाच्या गैरव्यवहाराबाबत

**(२) * १४०५३९ श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील सहकारनगर व पर्वती येथील १७ हजार १०० चौ.मी. शासकीय भूखंडावर नियमबाह्यरीत्या नियोजित सहकारी संस्था दर्शविण्यात आली असून नागरी जमीन कमाल धारणा (युएलसी) कलम २६ अन्वये पूर्वपरवानगी न घेता या भूखंडाची विक्री करून गैरव्यवहार करण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महसूल व महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संगनमताने बनावट प्रतिज्ञापत्र, दस्त व कागदपत्राआधारे शासनाची करोडो रुपयांची फसवणूक केली असून या प्रकरणातील दोषी व्यावसायिक व अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याबाबत लेखी मागणी सामाजिक कार्यकर्ते व संघटनांचे प्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त जमिनीची अवैधरीत्या विक्री करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) मौजे-पर्वती, ता.हवेली, जि.पुणे येथील सर्व्हे क्र. ८७/१/अ १ क्षेत्र १ हे.७१ आर. या जमिनीवर सन १९६६ च्या विकास आराखड्यानुसार पार्कचे आरक्षण असल्याने व नाजकधा अधिनियमानुसार सदरचे क्षेत्र अबांधिव क्षेत्र असल्याने त्या क्षेत्राची दि.१४.१२.१९८७ रोजी १८ व्यक्तींना विक्री झाल्याचे दिसून येत आहे. तथापि, सदरची जमीन सन १९९२ च्या विकास आराखड्यानुसार रहिवास विभागात समाविष्ट झाल्याने सर्व खरेदीदार व्यक्तींनी नाजकधा कलम ६(१) खाली सक्षम प्राधिकारी कार्यालयाकडे दाखल केलेले विवरणपत्र व अन्य नागरी समूहामध्ये जमीन धारण करत नसल्याचे प्रतिज्ञापत्र विचारात घेऊन सक्षम प्राधिकारी, पुणे नागरी समूह यांनी त्यांचे दि.१२.३.१९९३ च्या कलम ८(४) खालील आदेशानुसार नाजकधा अंतर्गतची कार्यवाही अंतीम केली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात क्षयरोग रुग्णांच्या संख्येत झालेली वाढ

**(३) * १३५२१४ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.अजय चौधरी (शिवडी), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.गोवर्धन शर्मा**

**(अकोला पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात क्षयरोगाच्या प्राथमिक औषधांना प्रतिसाद न देणाऱ्या क्षयरोग रुग्णांच्या संख्येत वाढ होत असून मुंबईसह राज्यातील इतर भागात क्षयरोगावर प्रतिबंध घालण्यासाठी तसेच क्षय रुग्णांना वेळेत योग्य उपचार मिळण्यासाठी राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत शासनाने "जीत" प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेतला असून सदर प्रकल्पाचे टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स येथे उद्घाटन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर जिल्हयात सन २०१८ या वर्षी ५२ हजारा पेक्षा जास्त क्षयरोगाचे रुग्ण असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये निदर्शनास आले असुन उपचारादरम्यान १६७ पेक्षा अधिक रुग्णांचा मृत्यु झाला आहे. तसेच अकोला जिल्ह्यातील खाजगी दवाखान्यांमध्ये ३५८ तर शासकीय रुग्णालयात १८२ रुग्णांची तपासणी केली असता त्यातील ४४० रुग्णांना क्षयरोग झाल्याचे माहे मे, २०१९ मध्ये निदर्शनास आले असुन भिवंडी (जि.ठाणे) शहरात सुमारे ७४३ क्षयरोगाचे रुग्ण माहे मार्च,२०१९ मध्ये आढळून आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, क्षयरोगाचे उच्चाटन करण्याकरिता राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची अंमलबजावणी योग्य प्रकारे होत नाही, तसेच सदर उपक्रमांबाबत जनजागृती, प्रसार व प्रचार करण्यात शासनाला अपयश आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, क्षयरोग होऊ नये यासाठी घ्यावयाची काळजी व या रोगाचे उच्चाटन होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात यते आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

खाजगी वैद्यकीय क्षेत्रात उपचार घेणाऱ्या क्षयरुग्णांचे व्यवस्थापन करण्यासाठी जीत प्रकल्प राबविण्यात येत आहे. त्याचे उद्घाटन मुंबई येथील TISS संस्थेच्या सभागृहात दि.१६ डिसेंबर, २०१८ रोजी आरोग्य मंत्री हयांचे हस्ते करण्यात आले.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत उपलब्ध सर्व उपक्रम केंद्र सरकारचे मार्गदर्शन तत्वानुसार राज्यात सर्वच जिल्हयात राबविण्यात येतात.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोठारी-हिमायतनगर (जि.नांदेड) या रस्त्याचे काम पुर्ण करण्याबाबत

**(४) * १४०५७९ श्री.प्रदीप नाईक (किनवट) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील किनवट-भोकर राष्ट्रीय महामार्ग क्र.१६१ वरील कोठारी हिमायतनगर या रस्त्याचे काम अर्धवट स्थितीत असुन निकृष्ट दर्जाचे करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या कामास केव्हा सुरुवात करण्यात आली व काम अर्धवट स्थितीत असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार कोठारी-हिमायतनगर या रस्त्याचे काम पुर्ण करुन निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या ठेकेदारांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

किनवट-भोकर हा रस्ता रा.म.क्र.१६१ ए असा असून सदर रस्त्याच्या कोठारी ते हिमायतनगर लांबीतील रस्त्याचे काम अर्धवट स्थितीत नसून प्रगतीपथावर आहे. तसेच सदर काम आवश्यक दर्जाचे गुणवत्तापूर्वक करुन घेण्यात येत आहे.

(२) व (३) सदर रस्त्याच्या कामास दि.२७.०६.२०१७ रोजी सुरुवात करण्यात आली असून हे काम अर्धवट स्थितीत नसून प्रगतीत आहे. सदयस्थितीत सुमारे १९ टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरीत कामाची गती वाढविण्यासाठी संबंधित ठेकेदार यांना तोंडी /लेखी सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच संबंधीत ठेकेदार यांच्या देयकामधून दंडापोटी रु.१.८२ कोटी इतकी रक्कम कपात करण्यात आली आहे.

(४) अ) उर्वरीत कामाची गती वाढवून काम पूर्ण करण्यासाठी संबंधित ठेकेदार यांना तोंडी /लेखी सूचना देण्यात आल्या आहेत.

ब) अनुक्रमांक १ च्या अनुषंगाने कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पनवेल महानगरपालिका हद्दीतील गृहनिर्माण संस्थाना वाटप केलेल्या जमिनीच्या ‘ब’ सत्ता प्रकारात बदल करण्याबाबत

**(५) * १३४८७१ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल महानगरपालिका हद्दीत अनेक गृहनिर्माण संस्थाना निवासी कारणासाठी वाटप केलेल्या “ब” सत्ता प्रकारच्या शासकीय जमिनीवरील गृहनिर्माण संस्थांच्या पूनर्विकासास मंजूरी मिळण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान प्रधान सचिव, महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी विभाग यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, “ब” सत्ता प्रकार असलेल्या सदर जमिनीवरील गृहनिर्माण संस्थांच्या इमारती जुन्या झाल्या असून मोडकळीस आल्या असल्याने मानवी जिवीतास धोका निर्माण झाला असून ‘ब’ सत्ता प्रकारात बदल न केल्यामुळे सदर जमिनीवरील गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्विकासात अडचणी निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून पनवेल महानगरपालिका हद्दीतील गृहनिर्माण संस्थांच्या पूनर्विकास प्रकल्पास मंजुरी मिळण्यासाठी या जमिनीच्या 'ब' सत्ता प्रकारात बदल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) रायगड जिल्ह्यामध्ये अनेक जमिनीचा धारणाधिकार नगर भूमापन अभिलेखात "ब" म्हणून दर्शविण्यात आला असून अशा "ब" वर्गातील काही जमिनीमध्ये इमारती बांधून तेथे सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन झाल्या आहेत. अशा "ब" वर्गातील जमिनी सहकारी गृहनिर्माण संस्थाच्या नावे अभिहस्तांतरित करण्यासाठी राजश्रिया सहकारी गृहनिर्माण संस्था, पनवेल यांचे दिनांक २०.३.२०१९ चे निवेदन शासनाकडे प्राप्त झाले होते. सदर निवेदन उचित कार्यवाहीसाठी जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडे पाठविण्यात आले आहे. त्यानुषंगाने नगर भूमापन अभिलेखाची पाहणी केली असता मौ. पनवेल येथे जवळपास ६०० "ब" सत्ताप्रकारच्या मिळकती आढळतात. सदर मिळकतीमध्ये वेळोवेळी खरेदी खताच्या व इतर हस्तांतरणाच्या नोंदी झाल्या आहेत. सदर प्रकरणाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, रायगड यांच्या स्तरावर छाननी सुरु आहे. जिल्हाधिकारी यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील उचित निर्णय घेण्याची तजविज ठेवण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्ह्यातील गौण खनिज स्वामीत्वधन पावत्यांच्या आधारे यवतमाळ जिल्ह्यातील पैनगंगा नदी पात्रातून वाळूचा उपसा होत असल्याबाबत

**(६) * १३५४८७ श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहूर (जि.नांदेड) तालुक्यात अभयारण्याचा अडसर ठरत असल्याने एकाही वाळू घाटाचा लिलाव झाला नाही परंतु विदर्भातील महागाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील काही वाळू घाटांचा लिलाव झाला असुन या घाटावरील गौण खनिज स्वामीत्वधन पावत्यांच्या आधारे पैनगंगा नदीच्या पात्रातून वाळूचा अवैध उपसा होत असल्याचे दिनांक ११ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महागाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील पैनगंगा नदी पात्रातील वरुडी येथील लिलाव धारकांकडून गौण खनिज स्वामीत्वधनाची एक पावती किनवटच्या (जि.नांदेड) नावे घेऊन या ऑनलाईन पावतीच्या आधारे तालुक्यातील टाकळणी व हडसणी येथे वाळूचा मोठया प्रमाणात अवैध उपसा सुरु असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहूर येथून मंगरुळपीरकडे क्षमतेपेक्षा अधिक रेती घेऊन जाणा-या चार टिप्परला प्रशासनाने ताब्यात घेतले असून एका पावतीवर एकच वाहतूक करण्याची परवानगी असताना एका पावतीच्या आधारे वाळू तस्कर अहोरात्र वाळूची वाहतूक करीत असल्याने शासनाच्या महसूलाचे नुकसान होत असून याकडे महसूल विभागातील अधिकारी दुर्लक्ष करत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करून बनावट पावत्याच्या आधारे वाळू तस्करी करणाऱ्या दोषींविरुद्ध व माहूर येथून मंगरुळपीरकडे क्षमतेपेक्षा अधिक रेती घेऊन जाणा-या चार टिप्परविरुद्ध तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) माहूर (जि.नांदेड) तालुक्यातील काही भाग हा पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रामध्ये येत असल्याने माहूर तालुक्यातील वाळूगट लिलावासाठी ठेवण्यात आला नाही. तथापि, पैनगंगा नदीपात्रातून अवैध वाळूचा उपसा होत असल्याची बाब निदर्शनास आली नाही.

(२) व (३) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लातूर जिल्ह्यातील पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पिक विमा मंजुर करण्याबाबत

**(७) * १३८५३० डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यामधील जळकोट तालुक्यातील १०२०० शेतकरी व उदगीर तालुक्यातील अंदाजे ३९४६८ शेतक-यांनी खरीप हंगाम सन २०१८ साठी सोयाबीन, तूर, मुग, उडीद इत्यादी पिकांचा प्रधानमंत्री पिक विमा योजनेंतर्गत बँकेद्वारा पिकविमा भरणा केला असुन हे दोन तालुके दुष्काळग्रस्त जाहिर केले असताना कृषी विभाग व पिकविमा कंपनीद्वारे चुकीच्या पध्दतीने सर्वेक्षण करुन शासनाला अहवाल पाठविल्यामुळे जळकोट तालुक्यातील १०२०० शेतकरी व उदगीर तालुक्यातील वाढवणा व नळीगीर या दोन मंडळातील अनुक्रमे ५६८० व ६०९७ शेतक-यांना पिक योजनेचा लाभ मिळालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप व रब्बी हंगाम २०१७-१८ व २०१८-१९ मधील लातूर, रेणापूर व औसा तालुक्यातील पिक विमा मंजूर झालेल्या महसूल मंडळातील अनेक गावे इतर महसूल मंडळात समाविष्ट झाल्याने व कांही गावे पोर्टलवरील मास्टर लिस्ट मधून वगळली असल्याने या गावातील शेतकरी विमा मंजुरीपासून वंचित राहिली असुन तांदुळजा (ता.लातूर) महसूल मंडळातील पिक विमा हप्ता भरलेल्या शेतकऱ्यांना खरीप हंगाम २०१८-१९ चा पिक विमा मंजूर झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,लातूर जिल्ह्यातील जळकोट, उदगीर रेणापूर, लातूर व औसा, तालुक्यातील शेतकऱ्यांना पिक विमा मंजूर करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी निवेदनाद्वारे शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार सदरहू शेतकऱ्यांना पिक विमा मंजुर करुन वाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अनिल बोंडे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप हंगाम २०१७ मधील नुकसान भरपाई माहे जुलै २०१८ मध्ये मंजूर झाल्यानंतर राष्ट्रीय पिक विमा पोर्टलवरील मास्टर लिस्ट मध्ये लातूर जिल्ह्यातील ३४ गावे चुकीच्या महसूल मंडळात नोंदविल्याचे दिसून आले. सदर ३४ गावातील खरीप हंगाम २०१७ मध्ये ३६८९३ पात्र शेतकऱ्यांना रु.४.९२ कोटी नुकसान भरपाई वितरीत करण्यात आली असून रब्बी हंगाम २०१७-१८ मध्ये ११,९०७ पात्र लाभार्थ्यांना रु.१.४७ कोटी नुकसान भरपाई वितरीत करण्यात आली आहे.

तथापि, लातूर जिल्ह्यातील रेणापूर, लातूर, औसा, जळकोट व उदगीर तालुक्यातील शेतकऱ्यांना पिक विमा मंजूर करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी निवेदनाद्वारे शासनाकडे मागणी केली आहे. हे खरे आहे.

(४) प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगाम २०१८ मध्ये भारतीय कृषि विमा कंपनीकडून राबविण्यात आली असून, औसा तालुक्यातील ९८०८० शेतकऱ्यांना रु.४९.९२ कोटी, लातूर तालुक्यातील ५३४७२ शेतकऱ्यांना रु.५४.५४ कोटी, रेणापूर तालुक्यातील ४५९ शेतकऱ्यांना ४.९३ लाख, तसेच उदगीर तालुक्यातील ७२५५१ शेतकऱ्यांना ३२.९७ कोटी इतकी पीक विमा नुकसान भरपाई विमा कंपनीमार्फत वितरीत करण्यात आलेली आहे. तसेच जळकोट तालुक्यातील तुर व कापूस पीकांची नुकसान भरपाई निश्चित करण्याची कार्यवाही सुरु असून, योजनेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार अधिसूचित विमा क्षेत्र घटकातील अधिसूचित पीकांखालील (तूर व कापूस वगळून) सरासरी उत्पन्न हे उंबरठा उत्पन्नापेक्षा जास्त आल्याने नुकसान भरपाई देय झाली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे दिघी (ता.पाचोरा, जि.जळगांव) येथील घरकुल लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देण्याबाबत

**(८) * १३७८१६ श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे दिघी (ता.पाचोरा, जि.जळगांव) येथे पुरातत्व विभागाच्या अंतर्गत येत असलेले हेमाडपंथी भवानी मातेचे मंदिर असून सदर मंदिर हे गावाला

लागूनच असल्याने प्राचिन स्मारके व पुरातत्वीय स्थळे व अवशेष अधिनियम, १९५८ च्या तरतूदीनुसार या मंदिराच्या परिघाच्या आता कोणतेही उत्खनन किंवा बांधकाम करु नये अशी तरतूद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तरतुदीमुळे या गावात प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना, शबरीमाता आवास योजना अंतर्गत घरकूल बांधकामासाठी जागा उपलब्ध होत नसल्याने लाभार्थ्यांना शासकीय गटातून जागा उपलब्ध करुन देण्याबाबतच लेखी निवेदन ग्रामपंचायत, दिघी यांनी दिनांक १४ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, जळगांव यांच्याकडे दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार या गावातील विविध योजनेअंतर्गतच्या घरकुल लाभार्थ्यांना शासकीय गटातून जागा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) होय.

(४) मौजे दिघी (ता.पाचोरा, जि.जळगांव) येथील घरकुल पात्र परंतू जागा उपलब्ध नसलेल्या लाभार्थींना शासकीय जमिन उपलब्ध करण्यासाठीचा प्रस्ताव दि.६.६.२०१९ रोजी जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडे सादर करण्यात आलेला असून या प्रकरणी कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे माजिवडे (ता.जि.ठाणे) येथील आदिवासी कुटुंबियांची जमीन 'मे.कल्पतरु प्रॉपर्टीज' या विकासकाने अवैधरित्या ताब्यात घेतल्याबाबत

**(९) * १३८९९६ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे माजिवडे (ता.जि.ठाणे) येथील सर्व्हे क्र.२९८ हिस्सा क्र.१, सर्व्हे क्र.२९७ हिस्सा क्र.३ व सर्व्हे क्र. २९८ हिस्सा क्र.५ ही आदिवासी कुटुंबियांची जमिन मे.कल्पतरु प्रॉपर्टीज या विकासकाने नियमबाह्यरित्या ताब्यात घेऊन त्यावर बांधकाम केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी तहसिलदार, ठाणे यांनी माहे जून, २०१७ च्या आदेशान्वये आदिवासींचे अपील मान्य करुन विकासकास मिळकतीवरील बांधकामासहीत मिळकतीचा ताबा आदिवासी कुटुंबास आठ दिवसात देण्याचे आदेश पारीत करुनही सदर मिळकतीचा ताबा अद्याप आदिवासी कुटुंबियास मिळाला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन सदर मिळकतीवर चालू असलेल्या बांधकामास स्थगिती देऊन सदर मिळकतीचा ताबा उक्त आदिवासी कुटुंबियांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) श्री.रामचंद्र शंकर घामोडे (मयत) तर्फे वारस श्रीमती कुसुम रामचंद्र घामोडे व इतर यांनी मौजे माजिवडे, ता.जि.ठाणे येथील स.नं. २९७/३ व २९८/१ या मिळकतीचा ताबा मिळणेसाठी महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यार्पित करण्यासाठी अधिनियम, १९७४ च्या कलम ३ अन्वये तहसिलदार, ठाणे यांच्याकडे दावा क्र.६६/२०१६ दाखल केला होता. सदर दावा तहसिलदार, ठाणे यांनी त्यांच्या दि.२१/०६/२०१७ च्या आदेशान्वये मंजूर करुन कल्पतरु मे. प्रॉपर्टीज (ठाणे) प्रा. लि. यांनी सदर मिळकतीवर चालू असलेल्या बांधकामासहित मिळकतीचा ताबा अर्जदार यांना देणेबाबत आदेश दिले आहेत.

तहसिलदार, ठाणे यांचे उक्त दि.२१/०६/२०१७ च्या आदेशाविरुध्द मे.कल्पतरु प्रॉपर्टीज (ठाणे) प्रा. लि. यांनी मा.महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुंबई यांच्याकडे अपील दाखल केले होते. सदर अपिलात मा.महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुंबई यांनी त्यांच्या दि.२६/१०/२०१८ च्या आदेशान्वये तहसिलदार, ठाणे यांचे उक्त दि.२१/०६/२०१७ चे आदेश रद्द केले आहेत.

-----------------

## डहाणू (जि.पालघर) या पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील तालुक्यातील चिकू बागायतीमध्ये कोणतेही बदल न करण्याबाबत

**(१०) * १३७७१३ श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील चिकू बागायतीमध्ये कोणतेही बदल न करण्याकरिता केंद्र शासनाने दिनांक २० जून, १९९९ रोजी सदर तालुका पर्यावरणदृष्टया संवेदनशील असल्याबाबत अधिसुचना काढली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अधिसुचनेचे पालन न करता चिकू बागायतदार व दलाल चिकू वाडयांचे ११ गुंठे प्लॉट पाडून त्यांची विक्री करून दुय्यम निबंधकाकडे नोंदणी करत असल्याचे व महसूल विभाग किरकोळ दंड आकारुन सदर विक्री कायदेशीर करत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार केंद्र शासनाच्या अधिसुचनेचे पालन न करणाऱ्या चिकू बागायतदार व संबंधित दलाल तसेच सदर विक्री कायदेशीर करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) भारत सरकारच्या दिनांक २०.०६.१९९१ च्या अधिसूचने अन्वये डहाणू तालुका पर्यावरण दृष्ट्या संवेदनशिल घोषित करण्यात आलेला आहे. मुंबई तुकडेबंदी व तुकडेजोड अधिनियम १९४७ च्या तरतूदीशी नुसार डहाणू तालुक्यातील दहा (१०) (जामशेत, सोगवे, आसवे, चरी, कोटबी, नंदारे, गंजाड, ऐने, डेहणे, व पळे) ही गावे वगळून उर्वरीत ग्रामीण भागाकरिता बागायती शेतजमिनीचे (म्हणजेच चिकू, आंबा, नारळ, काजू किंवा लिंबूवर्गीय फळे इ.) या फळबागायती शेतजमिनीची विक्री करण्यासाठी प्रमाणभूत विक्री क्षेत्र १० गुंठे असे आहे. दुय्यम निबंधक, कार्यालयाकडून शेतजमिनीच्या खरेदी-विक्री दस्तांची नोंदणी करताना संबंधित

शेत जमिनीच्या गा.न.नं ७/१२ ची पीकपाणी नोंद तपासून त्याप्रमाणे शेतजमिनीचे प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राचा तुकडा होणार नाही याची खात्री करुन दस्त नोंदणी केली जाते. त्यामध्ये शेतजमिनीच्या प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राच्या मिळकतीची खरेदी-विक्री झाल्याचे आढळून आलेले नाही. तसेच दंड आकारुन सदर विक्री कायदेशीर करणेत आलेली नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भडगाव (ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर) येथील हिरण्यकेशी नदीवरील पुलाचे रुंदीकरण करण्याबाबत

**(११) * १३७०७४ श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भडगाव (ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर) येथील हिरण्यकेशी नदीवरील मुंबई-पुणे-चंदगड व गोवा या ठिकाणांना जोडणाऱ्या पुलावरुन मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असुन सदर पूल अरुंद असल्यामुळे वाहतुक कोंडी होऊन अपघात घडण्याचे प्रमाण वाढल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पुलाच्या रुंदीकरणाबाबत संबंधित लोकप्रतिनिधीनी मा.सार्वजनिक बांधकाम तथा पालकमंत्री, कोल्हापूर यांचेकडे दिनांक ३० नोव्हेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या व लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार या पुलाचे रुंदीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) व (५) विषयांकित पुलाचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धततेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन आहे

-----------------

## नाशिक येथील सिव्हील रुग्णालयामध्ये बनावट शिक्क्यांच्या आधारे प्रमाणपत्रांचे होत असलेले वितरण

**(१२) * १३९२५९ श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथील सिव्हील रुग्णालयामध्ये जिल्हा शल्यचिकित्सक व सह जिल्हा शल्यचिकित्सक यांचे बनावट रबरी शिक्के व कोरे वैद्यकीय प्रमाणपत्र महापालिकेच्या एका कर्मचा-याकडून जप्त करण्यात आल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रुग्णालयामध्ये दाखल होणा-या बेवारस मृतदेहांची विल्हेवाट लावण्याचे काम महापालिकेने सोपविलेल्या कर्मचा-याकडून आजारपणाच्या रजा, अपंगत्वाचे दाखले व महत्वाच्या दाखल्यांसाठी या बनावट शिक्क्यांचा वापर झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,
(४) असल्यास, त्यानुसार चौकशीत दोषी आढळून आलेल्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय.
(२), (३) व (४) जिल्हा रुग्णालय, नाशिक येथे जिल्हा शल्यचिकित्सक आणि अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक यांचे दोन बनावट रबरी शिक्के सापडल्याने

नाशिक महानगरपालिकेच्या शवागारात काम करणाऱ्या संबंधित कर्मचाऱ्याविरुद्ध सरकारवाडा पोलीस स्टेशन, नाशिक येथे गु.र.नं. ०१२४/२०१९ भा.दं.वि.क. ४२०, ४६५, ४७२ व ३४ अन्वये दिनांक १५.०३.२०१९ रोजी दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## संग्रामपूर (जि.बुलडाणा) तालुक्यात विना परवाना रेती व्यवसाय सुरु असल्याबाबत

**(१३) * १३७३७९ श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संग्रामपूर (जि.बुलडाणा) तालुक्यात विना परवाना रेती व्यवसाय सुरु असून याकडे स्थानिक प्रशासनाकडून दुर्लक्ष केले जात असल्याने शासनाच्या महसुलाचे मोठया प्रमाणात नुकसान होत असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अवैध रेती व्यवसायाविरुद्ध महसूल व पोलीस प्रशासनाकडून कोणतीही कारवाई केली जात नसल्याने अवैध रेती उपसा केला जात असून त्यामुळे येथील १६०० ब्रास रेतीचा साठा दुर्लक्षीत होऊन पर्यावरणाचेही नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करुन संग्रामपूर तालुक्यात अवैध रेती व्यवसाय करणाऱ्या संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) संग्रामपूर (जि.बुलडाणा) तालुक्यात विनापरवाना वाळू वाहतूक सुरु असल्याचे निदर्शनास आल्याने गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूकीवर प्रतिबंध करण्यासाठी पथक स्थापन करण्यात आले आहे.

संग्रामपूर तालुक्यात विविध ठिकाणी माहे एप्रिल,२०१९ मध्ये जप्त केलेल्या १५७८ ब्रास वाळूसाठ्याचा लिलाव करण्यात आला असून सदर लिलावातून रु.२३,८१,०००/- इतका महसूल प्राप्त झाला आहे.

गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूक प्रतिबंध करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या पथकामार्फत बुलडाणा जिल्ह्यात माहे एप्रिल, २०१९ ते मे,२०१९ या कालावधीत गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूकीच्या ४४ प्रकरणी रु.१४,२७,७००/- इतकी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली आहे. तसेच ६ प्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात लष्करी अळीच्या प्रादुर्भावामुळे पिकांचे झालेले नुकसान

**(१४) * १३७६१५ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गुलाबी बोंड अळी पाठोपाठ आता कपाशी पिकांवर लष्करी अळीचा धोका वाढला असुन मका, ऊस व ज्वारी या पिकांवर लष्करी अळीचा प्रादुर्भाव झाल्याने शेतकऱ्यांनी त्या दृष्टीने काळजी घेण्याचे आवाहन अकोला येथील डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या कुलगुरूंनी माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लष्करी अळीच्या प्रादुर्भावामुळे आतापर्यंत किती नुकसान झाले असुन प्रादुर्भाव रोखण्यासाठी कृषी विद्यापीठाकडून कोणते संशोधन केले आहे,

(३) असल्यास, त्यानुसार लष्करी अळीच्या प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अनिल बोंडे :** (१) होय.

(२) व (३) आजमितीस ऊस, कापूस व ज्वारी इ. या पिकावर लष्करी अळीच्या प्रादुर्भावामुळे नुकसान झाल्याचे आढळून आलेले नाही.

या किडीचा प्रादुर्भाव आढळून येताच राज्यातील कृषि विद्यापीठांमार्फत शेतकरी व कृषि विस्तार कार्यकर्ते यांच्यामध्ये जनजागृती करुन खालीलप्रमाणे उपाययोजना सुचविण्यात आल्या.

"मक्यावरील अमेरीकन लष्करी अळी व्यवस्थापन" या विषयावर दि.२०.२.२०१९ रोजी औरंगाबाद येथे राज्यस्तरीय कार्यशाळा तर "कपाशीवरील गुलाबी बोंड अळी व मक्यावरील नविन अमेरिकन लष्करी अळीचे व्यवस्थापन" यावर विदर्भस्तरीय कार्यशाळा दि.८.४.२०१९ रोजी डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथे आयोजित करण्यात आली होती.

दि.१ मार्च, २०१९ रोजी संपन्न झालेल्या राहुरी कृषि विद्यापीठाच्या संशोधन नियोजन बैठकीत अमेरिकन लष्करी अळीच्या व्यवस्थापनासाठी जैविक व रासायनिक किटकनाशकांचे दोन स्वतंत्र प्रयोग घेवून त्याचे निष्कर्ष शिफारस करण्यासाठी सादर करण्यात येतील, असे प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

कृषि विभाग, महाराष्ट्र शासन व महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २०.४.२०१९ रोजी कृषि विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना "मक्यावरील लष्करी अळीचे व्यवस्थापन" या विषयावर प्रशिक्षण देण्यात आले. तसेच दि. २.५.२०१९ रोजी मा. कुलगुरु तसेच संशोधन संचालक, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी आणि मा. आयुक्त (कृषि) यांच्या उपस्थितीत खरीप आढावा बैठकीमध्ये मक्यावरील अमेरिकन लष्करी अळी, कपाशीवरील गुलाबी बोंडअळी या किडींच्या व्यवस्थापनाविषयी प्रशिक्षण देण्यात आले.

डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रांतर्गत मका पिकावर लष्करी अळीचा प्रादुर्भाव फेब्रुवारी, २०१९ दरम्यान अत्यल्प प्रमाणात आढळून आला असून त्याचे प्रमाण आर्थिक नुकसान पातळीच्या खाली आहे. या किडीच्या नियंत्रणासंबंधी उपाययोजनाविषयी सविस्तर लेख दापोली कृषि विद्यापीठामार्फत दैनिक ॲग्रोवनमध्ये दि. ७ मार्च, २०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे.

तसेच यासंदर्भात कृषि आयुक्तालय, पुणे येथे ३ राज्यस्तरीय बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या. या बैठकांमध्ये मक्यावरील लष्करी अळीबाबत सर्वतोपरी चर्चा व सर्वंकष नियंत्रणाचे पॅकेज तयार करुन राज्यस्तरावर प्रसारीत करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यात हायब्रीड ॲन्युईटी योजनेंतर्गत सुरु असलेल्या कामांबाबत

**(१५) * १३६२९२ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यात हायब्रीड ॲन्युईटी योजनेंतर्गत नांदेड ते वेल्हे, खानापूर ते पानशेत, खेड शिवापूर ते सिंहगड पायथा या रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे सुरु असुन या कार्यासाठी भौगोलिकदृष्ट्या विचार करून सलगरित्या खोदाई करण्यात येत नसून कामाच्या ठिकाणी कोणतीही सुरक्षितता न बाळगता निकृष्ट दर्जाची कामे सुरु असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खेड (जि.पुणे) तालुक्यातील आंबेठाण चौक ते करंजविहीरे (प्रजीमा २०) या औद्योगिक वसाहतीला जोडणाऱ्या मुख्य रस्त्याची मागील दोन वर्षापासून मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून या रस्त्याचे काम हायब्रीड ॲन्युईटी योजनेअंतर्गत मंजूर होवून १ वर्ष झाले असतानाही पूर्ण झाले नसल्याने प्रवाशांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या सर्व प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार वरील सर्व रस्त्यांची कामे गुणवत्तेसह तातडीने पूर्ण करून निकृष्ट दर्जाची कामे करणाऱ्या कंत्राटदारावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

पी.एन.२७ पॅकेजचे फायनान्शियल क्लोजर अद्योजकाने सादर केल्यानंतर दि.८/५/२०१९ हा नियुक्ती दिनांक (Appointed Date) देण्यात आला आहे.

सद्यस्थितीत अद्योजकाने काम हाती घेतले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) निरंक

-----------------

## कृषी मंत्रालयांतर्गतच्या गुण नियंत्रण विभागाचे कामकाज ऑफलाईन होत असल्याबाबत

**(१६) * १३६९५७ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कृषी मंत्रालयांतर्गतच्या गुण नियंत्रण विभागाचे कामकाज ऑनलाईन सुरु नसल्याने प्रत्यक्ष भेटुन ऑफलाईन परवाने घ्यावे लागत असल्याची तक्रार निविष्ठा उद्योगातून करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किटकनाशक उत्पादनांच्या दहा हजार कोटीच्या विक्रीसाठी कंपन्या, डिलर्स, विक्रेत्यांना कृषी विभागाचे परवाने घ्यावे लागत असुन सदर परवाने वितरित करताना ऑनलाईनचा उल्लेख असला तरी प्रत्यक्षात कृषी

आयुक्तालयाला भेट दिल्याशिवाय परवाने मंजूर केले जात नसुन ऑफलाईन कामकाजाला प्रोत्साहन दिले जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यवतमाळ जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर किटकनाशक विषबाधेची घटना घडलेली असतानाही किटकनाशके विक्री तपासणी, बनावट किटकनाशकांची माहिती शेतकऱ्यांना देणे तसेच परवाना पध्दतीत पारदर्शकता आणणे, ही कामे झालेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अनिल बोंडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

गुण नियंत्रण विभागासाठी सन २०१२ मध्ये (National Information Centre, Pune) यांचेकडून ई- परवाना संगणक प्रणाली विकसित करण्यात आली होती. त्यामध्ये ऑनलाईन अर्ज स्विकारले जात होते. किटकनाशके कायदयामध्ये वेळोवेळी सुधारणा होत असल्यामुळे सदर संगणक प्रणालीमध्ये वेळोवेळी बदल करणे गरजेचे ठरते. त्याचप्रमाणे संगणक प्रणालीची सातत्याने देखभाल करावी लागते. त्यानुषंगाने एन.आय.सी. पूणे यांना संगणक प्रणाली पुनर्विकसित करणेबाबत विनंती करण्यात आलेली होती. परंतु, एन.आय.सी. पूणे यांनी संगणक प्रणाली पुनर्विकसित करणे व देखभालीच्या कामास असमर्थता दर्शविली आहे.

त्यामुळे परवाना मंजूरीची कामे पारदर्शक पध्दतीने व विहित मुदतीत पार पाडण्याच्या दृष्टीने महाऑनलाईन या संस्थेकडून ई- परवाना संगणक प्रणाली विकसित करण्याचे काम अंतिम टप्प्यात आले असुन सर्व परवाने ऑनलाईन देण्यात येतील.

(३) विषबाधा टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत. किटकनाशके विक्री तपासणी, किटकनाशकांची माहिती शेतकऱ्यांना देणे तसेच, परवाना पध्दतीत पारदर्शकता आणणे यासाठी गुणवत्ता नियंत्रण विभाग व किटकनाशक उत्पादक / विक्रेते कंपन्यांसोबत जिल्हानिहाय नोडल

कंपन्यांची नेमणूक करुन व्यापक स्वरुपात शेतकऱ्यांमध्ये जनजागृती, प्रचार व प्रसिध्दी देण्यात येत आहे. तसेच, परवाना मंजूरीची कामे पारदर्शक पध्दतीने व विहित मुदतीत पार पाडण्याच्या दृष्टीने महाऑनलाईन या संस्थेकडून ई-परवाना संगणक प्रणाली विकसित करण्याचे काम अंतिम टप्यात असून सर्व परवाने ऑनलाईन देण्यात येतील.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्हयात कृषी विभागांतर्गत नियमबाहयरित्या झालेल्या कामांबाबत

**(१७) * १३५५४३ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयात २३ सप्टेंबर, २००८ ते १९ जून, २०१२ व २५ एप्रिल, २०१५ ते ३ जून, २०१८ या कालावधीत झालेल्या कृषी विभागाच्या नियमबाहय कामाच्या चौकशीचे आदेश कृषी सहसंचालक यांनी दिले असल्याचे दिनांक ३१ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, त्यानुसार उक्त कालावधीत बुलढाणा जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयांतर्गत करण्यात आलेल्या नियमबाहय कामांची चौकशी करून संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अनिल बोंडे :** (१) बुलढाणा जिल्ह्यातील दि. २३ सप्टेंबर, २००८ ते दि.१९ जून, २०१२ आणि दि. २५ एप्रिल, २०१५ ते दि. ३ जून, २०१८ या कालावधीत झालेल्या कृषि विभागाच्या कामाबाबत प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने मा. आयुक्त (कृषि) यांनी दि.२१/६/२०१८ च्या पत्रान्वये अधिक्षक कृषि अधिकारी (दक्षता पथक), कृषि आयुक्तालय, पुणे यांना क्षेत्रिय कामाची तपासणी करण्याबाबत तसेच सहायक संचालक (लेखा-२), कृषि आयुक्तालय, पुणे यांना जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, बुलढाणा कार्यालयातील लेखा विषयक बाबींची चौकशी करण्याबाबत निर्देश दिले आहेत. उक्त निर्देशांच्या अनुषंगाने सहायक संचालक (लेखा-२), कृषि आयुक्तालय, पुणे या कार्यासनाच्या पथकाद्वारे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, बुलढाणा या कार्यालयाचे दि. २४/९/२०१८ ते दि. २९/९/२०१८ या कालावधीत लेखा परिक्षण करण्यात आलेले आहे. तसेच दक्षात पथकामार्फत क्षेत्रीय कामाची चौकशी दि. ०१/०५/२०१९ ते दि. ७/०५/२०१९ या कालावधीत करण्यात आली आहे.

(२) प्रस्तुत प्रकरण सन २००८ ते सन २०१२ व सन २०१५ ते सन २०१८ या कालावधीतील आहे. सदरचा चौकशीचा कालावधी बराच मोठा असल्यामुळे सविस्तर अहवाल सादर करण्यास अधिकचा कालावधी लागणार आहे. सबब, चौकशीचा निष्कर्ष अद्याप प्राप्त झालेला नाही.

(३) चौकशीची कार्यवाही कार्यान्वित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सारसन आणि ठाणे न्हावे (ता.खालापूर, जि.रायगड) येथील ट्रक टर्मिनस खाजगीकरणांतर्गत विस्तारीत करण्याच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(१८) * १३८१७९ श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे महामार्गावरील सारसन आणि ठाणे न्हावे (ता.खालापूर, जि.रायगड) येथील ट्रक टर्मिनस खाजगीकरणांतर्गत विस्तारीत करण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने निविदा मागविल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निविदा प्राप्त करणाऱ्या कंत्राटदाराने बनावट अनुभवाचे प्रमाणपत्र व बनावट नेटवर्थ सर्टीफिकेट महामंडळाकडे सादर केल्याबाबत महालेखापालांच्या अहवालामध्ये आक्षेप घेण्यात आला असून निविदेच्या अटी-शर्ती बदलून मोठ्या प्रमाणावर अनियमितता करुन २५ एकर क्षेत्रफळाचे भूखंड महामंडळाने खाजगीकरणासाठी ठेकेदाराच्या नावे केल्याने शासनाचे सुमारे २००० कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर २००० कोटी रुपये उत्पन्न अपेक्षित असलेला भूखंड महामंडळाने ट्रक टर्मिनस, हॉटेल आणि पेट्रोल पंपासाठी केवळ १० कोटी रुपयांत मे. विक्रम टेलिमॅटीक्स, पुणे व मे. मिस्टॅकल टेक्नोप्लास्ट, ठाणे या कंपन्यांना देण्यात आल्याने याप्रकरणात मोठा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी तीन महिन्यात चौकशी करुन कारवाई करण्याचे आश्वासन मा.मंत्री महोदयांनी देऊन एक वर्ष झाले असतानाही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :**

(१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. ठाणेन्हावे व सारसन येथील ट्रक टर्मिनस या सुविधेकरीता प्राप्त निविदांमध्ये काही कंपन्यांचे अनुभव प्रमाणपत्र व नेटवर्थ सर्टिफिकेटमध्ये अनियमितता असल्याचा आक्षेप महालेखापालांच्या अहवालामध्ये घेण्यात आला होता. सदर आक्षेपाबाबत महामंडळाकडून महालेखापाल कार्यालयास अहवाल सादर करण्यात आलेले आहेत.

या वाहनतळासाठी दिलेले भुखंड ३० वर्षांकरीता भाडेतत्वावर कंत्राटदारांना दिलेले असून सदर भुखंड हे महामंडळाच्याच नावे आहेत. याभूखंडावर अत्यावश्यक सुविधा गरजेचे असलेले ट्रक टर्मिनस उभारले आहे.

महामंडळास प्राप्त होणाऱ्या अधिमुल्य रक्कमेपोटी ८० वर्षांनतंरचे काल्पनिक मुल्य रुपये२००० कोटी दर्शविले आहे. सदर जमिनीचे मुल्य हे शासकीय Ready Recknor Rates प्रमाणे ठरविण्यात आले आहे. ट्रक टर्मिनससाठी भुखंड ३० वर्षांच्या भाडेपट्टयावर दिले असून मुदतीनंतर हे भुखंड महामंडळाकडे त्यावरील बांधकामासह ताब्यात येतील.

(३) हे खरे नाही, महामंडळास प्राप्त होणाऱ्या अधिमुल्य रक्कमेपोटी ८० वर्षांनतंरचे काल्पनिक मुल्य रुपये २००० कोटी दर्शविले आहे. सदर भुखंडांपोटी महामंडळाला १६.६१ कोटी रुपये अधीमुल्य प्राप्त होत आहे. तसेच ट्रक टर्मिनस उभारण्यापोटीचा किमान खर्च प्रत्येकी रु.२० कोटी असा एकूण रु.४० कोटी रुपये इतका आहे. याव्यतिरिक्त पार्किंगच्या महसूलाचा ५० टक्के वाटा महामंडळाला देण्याचे करारनाम्यात नमूद केले आहे. वाणिज्यीक वापराच्या सुविधेपोटी उभारण्यात आलेली इमारत व इतर सोई-सुविधा महामंडळाला ३० वर्षांनतंर सुपूर्द करण्यात येणार आहेत. या प्रकरणामध्ये महामंडळाचे कोणतेही आर्थिक नुकसान झालेले नाही.

(४) व (५) हे खरे नाही. महामंडळाकडे ट्रक टर्मिनसच्या बाबतीत प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने सह व्यवस्थापकीय संचालक (प्रशासन व वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. सदर चौकशी समितीचा अहवाल दि.३१.०१.२०१८ रोजी महामंडळास सादर करण्यात आला. सदर चौकशी अहवाल संचालक मंडळाच्या दि.१४.२.२०१८ व दि.०४.०५.२०१८ रोजीच्या बैठकीत चर्चेस ठेवला होता. सदर समिती अहवालानुसार सदर निविदा प्रक्रियेतील मौजे सारसन येथील ट्रक टर्मिनल संदर्भात निविदा छाननीमधील काही प्रशासकीय त्रुटी वगळता कोणतेही तथ्य आढळुन येत नाही व प्रकल्पांचे कार्यान्वय चालू ठेवणे महामंडळाच्या हिताचे आहे, असा निष्कर्ष नोंदवला आहे. चौकशी समिती अहवालानुसार सदर व्यवहारात महामंडळाचे कोणतेही आर्थिक नुकसान झालेले नाही. तसेच महामंडळाचे कोणतेही अधिकारी दोषी असल्याचा निष्कर्ष समितीने नोंदविलेला नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसई (जि.पालघर) समुद्र किनाऱ्याजवळ बेकायदा वाळू उपसा सुरु असल्याबाबत

**(१९) * १४००४३ श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) समुद्रकिनाऱ्याजवळील बेकायदा वाळू उपशामुळे किनारा खचत असून वाळूचीही मोठ्या प्रमाणात धूप होत असल्यामुळे प्रचंड लाटा उसळुन पर्यटकांच्या जीवास धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महसूल विभागातील अधिकारी व वाळू माफिया यांच्या संगनमताने वाळू उपसा सुरु असुन येथे बेकायदेशीर वाळू उपसा करणाऱ्यांवर महसूल विभागाकडून कोणती कारवाई केली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन वसई समुद्रकिनाऱ्याजवळ बेकायदा वाळू उपसा करणाऱ्या वाळू माफियांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्हयात बनावट वाळू विक्री होत असल्याबाबत

**(२०) * १४१३१९ श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयात वाळू उपशावर बंदी असल्यामुळे बनावट काळी वाळू तयार करुन विक्री करण्यात येत असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाळू उपसा बंदीमुळे निर्माण झालेल्या वाळू टंचाईचा फायदा घेऊन समुद्राची वाळू, फाउंड्रीतून बाहेर पडणारी काळी वाळू आणि क्रशसँड म्हणजे क्रशरमध्ये राहणारी पावडर यांचे मिश्रण नगरची काळी वाळू म्हणून मोठया प्रमाणात कोल्हापूर शहरात विकण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार कोल्हापूर जिल्हयात बनावट काळी वाळू विकणाऱ्या दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रेणापूर (जि.लातूर) तालुक्यात अतिवृष्टीमुळे जमिनीची धूप झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(२१) * १३९७९० श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रेणापूर (जि.लातूर) तालुक्यामध्ये सन २०१६-१७ या कालावधीत अतिवृष्टीमुळे जमिनीची धुप होऊन जमिन वाहून गेल्यामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांची नावे जिल्हाधिकारी, लातूर यांनी शासनास सादर केलेल्या नुकसान भरपाई मागणीच्या यादीत समाविष्ट न केल्यामुळे शेतकऱ्यांना मदतीपासून वंचित राहावे लागले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मदतीस पात्र असतानाही तहसीलदार, रेणापूर यांच्या निष्काळजीपणामुळे वंचित राहिलेल्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याची मागणी लातूर, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक ११ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास तसेच जिल्हाधिकारी, लातूर यांच्याकडे दिनांक ७ डिसेंबर, २०१८ रोजी निवेदनाद्वारे केली असुन जिल्हाधिकारी यांनी सदरचा प्रस्ताव पत्रान्वये उप सचिव, मदत व पुनर्वसन विभाग यांच्याकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत व प्रस्ताव सादर करण्यास विलंब करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) व (२) होय, हे अंशतः खरे आहे.

(३) जिल्हाधिकारी, लातूर यांच्याकडून रेणापूर तालुक्यात माहे जुलै ते ऑक्टोबर, २०१६ या कालावधीत अतिवृष्टीमुळे आलेल्या पुरामुळे शेतजमिनी खरडून / वाहून गेलेल्या जमीनीच्या नुकसानीसाठी बाधित शेतकऱ्यांना मदत देण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला असून सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कांदिवली (मुंबई) येथील राज्य कामगार विमा रुग्णालयातील अपुऱ्या वैद्यकीय सोयी-सुविधांबाबत

**(२२) * १३५६३० श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांदिवली (मुंबई) येथील राज्य कामगार विमा रुग्णालयामध्ये प्रसूतिगृह, नवजात शिशुंची काळजी घेण्यासाठी विशेष कक्ष, तसेच आय.सी.यु. कक्षाची उपलब्धता नसल्यामुळे या रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना इतर रुग्णालयात उपचारासाठी पाठविण्यात येत असल्याची बाब माहे एप्रिल, २०१९ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय व त्याचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, त्यानुसार या रुग्णालयात अद्ययावत वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) राज्य कामगार विमा योजनेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवा या अधिक सुलभतेने व परिणामकारकरित्या पुरविता याव्यात याकरीता राज्य कामगार विमा महामंडळाने प्रस्तावित केल्यानुसार शासनाने राज्य कामगार विमा योजनेकरीता दि.०५.०५.२०१८ रोजी सोसायटी स्थापित करावयाचा घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने दि.११.०३.२०१९ रोजी "महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी" ची नोंदणी करण्यात आली असून तसेच सदर सासायटी मार्फत सदर रुग्णालयातील प्रसूतिगृह, NICU व ICU या सेवा सुरु करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत असल्याने चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) सोसायटी मार्फत सदर रुग्णालयातील प्रस्तुतीगृह, NICU व ICU या सेवा सुरु करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालव (चौल) (ता.आलिबाग, जि.रायगड) येथील डायनॅमिक्स व्हेकेशन रिसॉर्ट प्रा.लि. या कंपनीने विनापरवाना कांदळवनाची तोड केल्याबाबत

**(२३) * १३८२१८ डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालव (चौल) (ता.आलिबाग, जि.रायगड) येथील डायनॅमिक्स व्हेकेशन रिसॉर्ट प्रा.लि. या कंपनीच्या संचालक व बिल्डरने स्वतःच्या मालकीच्या जमिनीसह आजूबाजूच्या परिसरातील शासकीय जमिनीवरील कांदळवनाची विना परवाना तोड केल्याबाबत माहितीच्या अधिकारातून मिळालेल्या माहितीच्या आधारे ग्रामस्थ श्री.संजय सांवत यांनी महसूल विभागाकडे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने महसूल विभागाने कांदळवनाची विना परवाना तोड केल्याबाबतचा अहवाल वन विभागाकडून मागविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अहवालातील निष्कर्षानुसार विना परवाना बेकायदा कांदळवनाची तोड करणाऱ्या कंपनीचे संचालक व संबंधित बिल्डर यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) होय, हे खरे आहे, परिक्षेत्र वन अधिकारी अलिबाग यांनी सदर प्रकरणी स्थानिक वनपाल नागाव यांचे मार्फत पंचनामा करून दि. २३.०१.२०१९ अन्वये अहवाल तहसिलदार, अलिबाग यांना सादर केला आहे. कांदळवन तोडी संदर्भात मे. डायनॅमिक्स व्हेकेशन रिसॉर्ट प्रा.लि., श्री. निरंजन एल. हिरानंदानी यांचे विरुद्ध उपविभागीय अधिकारी अलिबाग यांनी मुख्य न्यायदंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम १९ अन्वये रे. के. नं. ५२/२०१९ अन्वये दावा दाखल केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यावल, रावेर व चोपडा (जि.जळगाव) या तालुक्यातील केळी उत्पादक शेतक-यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत

**(२४) * १३८३७२ श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यावल, रावेर व चोपडा (जि.जळगाव) या तालुक्यांमध्ये उष्णता खुप वाढल्यामुळे जमिनीतील पाण्याची पातळी कमी होऊन केळीचे पिक जळून गेले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंदाजे १५० ते २०० कोटी रुपयांच्या केळी पिकांचे नुकसान झाले असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी नुकसान झालेल्या केळी पिकांचे पंचनामे करून शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे निदर्शनास आले नाही.
(३) पंचनामे करण्याची कार्यवाही करण्यात आलेली नाही. तथापि, विमा कंपनी मार्फत नुकसान भरपाई देय आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई क्रिकेट असोसिएशनला थकित कर भरण्यासाठी मुंबई जिल्हाधिकारी कार्यालयाने नोटीस दिल्याबाबत

**(२५) * १३७३५१ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील वानखेडे स्टेडिअमसाठी मुंबई क्रिकेट असोसिएशनला शासनाने ५० वर्षाच्या कराराने भाडेतत्वावर दिलेल्या जागेची मुदत गत वर्षी माहे फेब्रुवारी महिन्यात संपली असून करार नुतनीकरण, थकीत कर व अनधिकृत बांधकाम प्रकरणी जिल्हाधिकारी, मुंबई शहर कार्यालयाने मुंबई क्रिकेट असोसिएशनला १२० कोटी १६ लाख १७ हजार ८५ रुपये भरणा करण्याची नोटीस बजावली असल्याचे दिनांक २३ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई क्रिकेट असोसिएशन व शासन यांच्यामध्ये झालेल्या करारानुसार एमसीए शासनाला निर्माण क्षेत्राचे १ रुपया प्रती गज आणी रिकाम्या क्षेत्राचे १० पैसे प्रती गज या दराने भाडे देणार होते तसेच एमसीएने क्रिकेट सेंटर बनविल्यानंतर शासनाने नवीन भाड्याचा दावा सुद्धा केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भाडे न भरल्यास जागा रिक्त करण्याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी कार्यालयाने दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन वानखडे स्टेडिअमबाबत योग्य निर्णय घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) फोर्ट महसूल विभागातील भू. क्र.९/१७७८ ही मिळकत दि.०६/०२/१९६८ रोजी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, इलाखा शहर यांच्याकडून ५० वर्षांसाठी रु.१ प्रती चौ.वार बांधीव क्षेत्रासाठी व १० पैसे प्रती चौ.वार मोकळ्या जागेसाठी या दराने मुंबई क्रिकेट असोसिएशनला भाडेपट्ट्याने दिलेली होती. सदर मिळकतीचा भाडेपट्टा दि.०५/०२/२०१८ रोजी संपुष्टात आलेला आहे. सदर मिळकतीच्या भाडेपट्टा नुतनीकरणासाठी मुंबई क्रिकेट असोसिएशने दि.०७.०४.२०१७ रोजीच्या पत्रान्वये मा. मुख्यमंत्री महोदयांना विनंती केलेली आहे. भाडेपट्टाकरार नुतनीकरण, थकीत कर याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी मुंबई क्रिकेट असोसिएशन (एमसीए) ला दि. १६ एप्रिल, २०१९ रोजी नोटीस पाठविलेली आहे. सदर नोटिशीत महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ५३ अन्वये करण्यात आलेली तरतूद नमूद करुन मुंबई क्रिकेट असोशिएशनला भाडेपट्टानुतनीकरणासाठी रु.१२०,१६,१७,०८५/- भरणे आवश्यक असल्याचे जिल्हाधिका-यांनी कळविले आहे. त्यानुषंगाने सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, मुंबई शहर कार्यालयामार्फत संबंधितास सुनावणी देण्यात येत असून दि.१८/०६/२०१९ रोजी पुढील सुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदगांव (जि.नाशिक) तालुक्यातील गावांना गावठाण मंजूर करण्याबाबत

**(२६) * १३९३७४ श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मल्हारवाडी, गिरणानगर, क्रांतीनगर, श्रीरामनगर, फुलेनगर, गंगाधरी (ता.नांदगांव, जि.नाशिक) या गावांना गावठाण उपलब्ध नसल्यामुळे या गावातील ग्रामस्थ अनेक वर्षांपासून मुलभूत सुविधा व अन्य शासकीय योजनांचा लाभ मिळण्यापासून वंचित राहत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त गावांना गावठाण क्षेत्र मंजुर करण्याबाबत तहसिलदार, नांदगांव यांनी जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे पाठविलेला प्रस्ताव प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार उपरोक्त संबंधित गावांना गावठाण मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) मल्हारवाडी, गिरणानगर, क्रांतीनगर, श्रीरामनगर, फुलेनगर, गंगाधरी या गावच्या ग्रामपंचायतींना गावठाण मंजूरी संबंधित ग्रामपंचायत यांचेकडील फक्त ठराव गटविकास अधिकारी, पंचायत समिती, नांदगांव यांचेमार्फत तहसिलदार, नांदगांव यांचे कार्यालयास प्राप्त झाले आहेत. प्रस्तुत प्रकरणी फक्त ठराव प्राप्त असल्याने गटविकास अधिकारी व संबंधित ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक यांची तहसिलदार, नांदगांव यांनी संयुक्त बैठक घेऊन परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील कृषी विद्यापीठातील प्राध्यापकांना बेकायदा वेतनवाढ देऊन केलेला गैरव्यवहार

**(२७) * १३८३०४ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील चार कृषी विद्यापीठातील ८०० प्राध्यापकांना बेकायदा वेतनवाढ देवून २५० कोटी रूपयांचा गैरव्यवहार केला असल्याचे दिनांक २६ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने बेकायदा वेतनवाढीनुसार दिलेली रक्कम संबंधिताकडून वसुल करण्याबाबत व सदरहू गैरव्यवहारात सहभागी असलेल्या प्रशासनातील संबधित अधिका-यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अनिल बोंडे :** (१) हे खरे नाही.

तथापि महाराष्ट्रातील चारही कृषि विद्यापीठातील शिक्षकवर्गीय अधिकारी यांना शासन निर्णय दि.१८/३/२०१० व शासन शुध्दीपत्रक दि.२०/९/२०१० अन्वये सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्यात आल्या असून शासन शुध्दीपत्रक दि.२०/९/२०१० अन्वये सहाय्यक प्राध्यापक/ सहयोगी प्राध्यापक यांना चुकीची वेतनश्रेणी लागू करण्यात आल्या मुळे त्यांना वेतनात रक्कम अतिप्रदान झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी चारही कृषि विद्यापीठातील सहाय्यक प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक यांना चुकीची वेतनश्रेणी लागू करण्यात आल्याचे निदर्शनास आल्या नंतर अतिप्रदान झालेली रक्कम वसूल करण्यासाठी कृषि विभागाचा शासन निर्णय दि. २४/८/२०१८ अन्वये दि. २०/९/२०१० चे शासन शुध्दीपत्रक पुर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आलेले आहे. याप्रकरणी जबाबदार असलेल्या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचे विरुध्द कार्यवाहीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

# कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) खाडी किनाऱ्यावर अवैध रेती उपसा होत असल्याबाबत

**(२८) * १३८३५१ श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) खाडी किनाऱ्यावर रेती उपसा करण्यासाठी बंदी असतानाही सक्शन पंपाद्वारे शेकडो ब्रास रेतीचा अवैध उपसा केला जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कल्याण-डोंबिवली खाडी-किनाऱ्याच्या बाजूला रेल्वे मार्ग असून रात्रीच्या वेळी रेती उपसा व वाहतूक केली जात असल्याने रेल्वे रूळांना धोका निर्माण झाल्याचे तसेच या अवैध रेती उपसा प्रकरणी स्थानिक पोलीस स्थानकात अज्ञात रेती माफियांवर गुन्हे दाखल करुन याकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार कल्याण डोंबिवली खाडी किनारी अवैध रेती उपसा करणाऱ्या रेती माफियांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

(२) अशी बाब निदर्शनास आली नाही.

कल्याण डोंबिवली खाडी परिसरात अवैध रेती उपसा होत असल्याचे निदर्शनास आल्यास वेळोवेळी महसूल प्रशासन व पोलीस विभाग यांच्याकडून संबंधितांविरुध्द कारवाई करण्यात येते.

(३) व (४) गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूकीस आळा घालण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांचे स्तरावर विशेष दक्षता पथके स्थापन करण्यात आली आहेत. सदर पथकामार्फत वेळोवेळी गौणखनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूकीच्या प्रकरणी दंडात्मक तसेच फौजदारी कारवाई करण्यात येते. त्यानुसार सन २०१८-२०१९ या

कालावधीत कल्याण तालुक्यात गौण खनिजाचे अवैध वाहतूकीच्या ३४ प्रकरणात रु.२३.४९ लक्ष इतकी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली असून ३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भायखळा (मुंबई) येथील सीएस क्र. १४७१ या भूखंडाचा अनधिकृतरित्या वापर होत असल्याबाबत

**(२९) * १३५३४९ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भायखळा (मुंबई) येथील सर जे.जे. रुग्णालय, कॉर्नर कोर्ट जवळच्या सीएस क्र.१४७१ मधील शासकीय मिळकतीचा भाडेपट्टा दिनांक ०७ ऑक्टोबर, २०१६ रोजी संपुष्टात आला असताना शासन जमा झालेल्या या भूखंडावर अतिक्रमण झाल्याचे तसेच भूखंडाचा वापर लग्न, सभा इत्यादी कामासाठी करण्यात येत असल्याचे दिनांक ४ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार सदर भूखंडावरील अतिक्रमण व होत असलेले अनधिकृत कार्यक्रम रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), व (३) भायखळा महसूल विभागातील भूकर क्र.१४७१ ही शासकीय मिळकत तीन स्वतंत्र भाडेपट्टाकरारांन्वये मे. रिचर्डसन ॲन्ड क्रुडास (१९७२) लि. या केंद्र शासनाच्या उपक्रमास देण्यात आलेली असून सदर भाडेपट्ट्यांचा कालावधी अनुक्रमे दि.२७/०३/१९७४, दि.११/०८/१९९२ व दि.३१/०८/२००२ रोजी संपुष्टात आला आहे. सदर कंपनीने शासन निर्णय क्र.२५०५/प्र.क्र.४०५/ ज-२, दि.१२.१२.२०१२ मधील तरतुदींनुसार नुसार उक्त नमूद मिळकत भोगवटादार वर्ग-२ म्हणून रुपांतरित करण्यासाठी

जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचेकडे अर्ज केला होता. तथापि, मे. रिचर्डसन ॲन्ड क्रुडास (१९७२) लि. यांनी सदर मिळकत ज्या प्रयोजनासाठी देण्यात आली होती त्या प्रयोजनामध्ये बदल केल्याचे तसेच सदर मिळकत शासनाच्या पूर्वपरवानगी शिवाय वाणिज्यिक प्रयोजनाकरीता उपभाडेपट्ट्याने दिल्याचे निदर्शनास आल्याने भाडेपट्टा करारातील अटी व शर्तीचा भंग केल्यावरुन जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्या दि.०७/१०/२०१६ रोजीच्या आदेशान्वये सदर मिळकत शासन जमा करण्यात आली असून मिळकतपत्रिकेमधून भाडेपट्टाधारक मे. रिचर्डसन ॲन्ड क्रुडास (१९७२)लि. यांचे नाव कमी करून "महाराष्ट्र शासन" असे नाव दाखल करण्यात आले आहे.

जिल्हाधिका-यांच्या उक्त आदेशाविरुद्ध मे.रिचर्डसन एण्ड क्रुडास (१९७२) लि. यांनी मा.उच्च न्यायालयात रिट पिटीशन (एल) क्र.३०७५/२०१६ (रिट पिटीशन क्र.६३३/२०१७) याचिका दाखल केल्या असून प्रकरणी "जैसे थे" परिस्थिती ठेवण्यास मा.उच्च न्यायालयाने आदेशित केले असून मेमोरँडम ऑफ असोशिएशन आणि आर्टिकल्स ऑफ असोशिएशन प्रमाणे वापर चालू ठेवण्यास मा. उच्च न्यायालयाने मुभा दिली आहे.

याप्रकरणी समोपचाराने मार्ग काढण्याच्या दृष्टीने जे.जे.रुग्णालयाच्या विस्तारीकरणाकरिता उक्त जमीन आवश्यक असल्याने ५०% जमीन शासनजमा करुन उर्वरित ५०% जमिनीच्या भाडेपट्ट्याचे नुतनीकरण करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भुदरगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत

**(३०) * १३६३६१ श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुदरगड (जि.कोल्हापूर) तालुक्यात पावसाळयामध्ये वादळी वाऱ्यासह झालेला पाऊस व नैसर्गिक आपत्तीत नुकसान झालेल्या २०९ शेतकऱ्यांपैकी

फक्त २५ शेतकऱ्यांनाच १,३२,६२५ रुपये एवढी नुकसान भरपाई मिळाली असुन उर्वरित १८४ शेतकरी नुकसान भरपाईपासून वंचित असल्याचे माहे फेब्रुवारी,२०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने उर्वरित नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) दिनांक ३१ जानेवारी, १९८३ च्या शासन निर्णयात नमूद केलेल्या निकषात बसत असलेल्या पात्र नुकसानग्रस्तांना नुकसान भरपाई देण्यात आली आहे. तथापि सदर शासन निर्णयाच्या निकषात बसत नसलेल्या नुकसानग्रस्तांना नुकसान भरपाई देता आली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील अंबाडी-उसगाव या मार्गाचे काम निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत

**(३१) * १३६३७१ श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाडी -उसगाव (राज्यमार्ग क्र. ८१) या भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील प्रसिद्ध वज्रेश्वरी देवस्थान मधून जाणाऱ्या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रिटीकरणाचे काम अंदाजपत्रकानुसार न करता निकृष्ट दर्जाचे केल्याने नागरिकांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांना निवेदन देऊन आंदोलनाचा इशारा दिल्याचे माहे जानेवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्याच्या निकृष्ट दर्जाच्या कामाबाबत उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भिवंडी यांच्याकडे वेळोवेळी तक्रारी करूनही त्यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार या रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या दोषींवर व कामाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

प्रश्नांकित भिवंडी तालुक्यातील एस. टी. डेपो (पारनाका) अर्नाळा पडघा कल्याण शिळ मोहपे रस्ता रा.मा.८१ असा आहे. सदर अंबाडी उसगाव या भिवंडी जि.ठाणे तालुक्यातील प्रसिध्द वज्रेश्वरी देवस्थानातून जाणाऱ्या रस्त्याच्या सिमेंट कॉक्रीटीकरणाचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व संघटनांनी मागणी केली होती.

सद्य:स्थितीत सदर रस्त्याचे कॉक्रीटीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे, व या रस्त्याचे काम पूर्ण केल्याबद्दल स्थानिक लोकप्रतिनिधी व संघटनांनी समाधान व्यक्त केले आहे.

सद्य:स्थितीत रस्त्यावरील वाहतूक सुरळीत सुरु आहे.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आरोग्य विभागाने कर्करोगावार उपचारासाठी तयार केलेल्या मार्गदर्शक तत्वांच्या नियमावलीची अंमलबजावणी करण्याबाबत

**(३२) * १३५३१७ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा फुले जनआरोग्य आणि आयुष्यमान योजनेअंतर्गत कर्करोगावर योग्य उपचार मिळण्यासाठी आरोग्य विभागाने टाटा मेमोरियल रुग्णालयाच्या मदतीने मार्गदर्शक तत्वांची नियमावली तयार केली असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू नियमावली आरोग्य विमा योजनेत सहभागी असणाऱ्या सर्व खासगी आणि शासकीय रुग्णालयांना बंधनकारक असुन या नियमावलीचे सॉफ्टवेअर तयार करून ते योजनेत सहभागी असणाऱ्या रुग्णालयांना पुरविले जाणार असुन त्यामुळे रुग्णांच्या उपचारांना योग्य दिशा मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यभरातील खासगी आणि शासकीय रुग्णालयांमध्ये या मार्गदर्शक नियमावलीची तातडीने अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) होय. महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना आणि प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या योजनेंतर्गत कर्करोगाच्या प्रोसिजर्सच्या टाटा कॅन्सर सेंटरचा मोठा सहभाग असलेल्या नॅशनल कॅन्सर ग्रीडच्या मार्गदर्शक तत्त्वांना आधारभूत ठेवून शासकीय रुग्णालयांच्या तज्ञ डॉक्टरांच्या मदतीने मार्गदर्शक तत्त्वांची (क्लिनिकल प्रोटोकॉल) सुधारीत नियमावली तयार केली आहे.

कर्करोग विशेषज्ञ सेवा असलेल्या सर्व अंगीकृत रुग्णालयांना सदर प्रोटोकॉल्स फॉर्म ऑनलाईन भरणे बंधनकारक आहे.

क्लिनिकल प्रोटाकॉलमुळे रुग्णालयांना योग्य उपचार निवडण्यास मदत होते. तसेच प्रोसिजर्सच्या गैरवापरावर सुध्दा आळा घालता येतो. संगणक प्रणालीमध्ये क्लिनिकल प्रोटोकॉल्सचे मोड्युल पुर्ण भरल्यानंतरच रुग्णालये उपचारपुर्व मान्यता पाठवू शकतात.

(३) शासकीय रुग्णालयांच्या तज्ञ डॉक्टरांच्या मदतीने मार्गदर्शक तत्त्वांची (क्लिनिकल प्रोटोकॉल) सुधारीत नियमावली तयार केली असुन हे प्रोटोकॉल्स संगणक प्रणालीबरोबर लवकरच संलग्नित करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सारमळ (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील बिग स्पेस रिअल्टी कंपनीने बनावट दस्तऐवज सादर करून जमीन अकृषक केल्याबाबत

**(३३) * १३८६७० श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सारमळ (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील बिग स्पेस रिअल्टी कंपनीने सन २००८ मध्ये बनावट दस्तऐवज सादर करून जमीन (एन.ए.) अकृषक केल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार बनावट दस्तऐवज सादर करून जमीन अकृषक करणाऱ्या कंपनीविरुद्ध तसेच सदर दस्ताऐवज तपासणी न करता जागा (एन.ए) अकृषक करून देणाऱ्या महसूल विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) मौजे सारमाळ, ता.शहापूर, जि.ठाणे येथील स.नं. १८, १९, २०, २१, २२, २३, २४, २५, २६, २७अ, २७ब, २८, २९, ३०, ३१, ३२, ३३, ३४, ३५, ३६, ३७, ३८, ३९, ४०, ४१, ४२, ४३, ४४, ४५, ४६, ४७, ४८, ४९, ५०, ५१, ५२, ५३, ५४, ५५, ५६, ५७, ५८ एकूण क्षेत्र २,९०,४४०.०० चौ.मी. पैकी भूसंपादनाचे क्षेत्र ६,१४०.०० चौ.मी. वगळून उर्वरित क्षेत्र २,८४,३००.०० चौ.मी. या जमिनीस सहायक संचालक नगर रचना, ठाणे यांनी केलेल्या शिफारशीनुसार जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या दिनांक १८/०९/२००८ च्या आदेशान्वये वेअर हाऊसेस गोडाऊन या वाणिज्य वापरासाठी अभिन्यास व बांधकाम नकाशांना श्री.गोविंद पांडू शेलार व इतर यांचे कुलमुखत्यारपत्र धारक श्री.दिलीपकुमार जैन यांच्या नावे मंजुरी व बिनशेती परवानगी दिली आहे.

उपरोक्त जमिनीचे आज रोजीचे अधिकार अभिलेख पाहता मौजे सारमाळ, ता.शहापूर येथील स.नं. १८, १९, २४, २५, २७अ, २७ब, २८, २९, ३२, ३३, ३४, ३५, ३९, ४०, ४२, ४९, ५१, ५२, ५३, ५८ या जमिनी फेरफार

क्रमांक ४२७, ४२८, ४२९, ४३०, ४३१, ४३२, ४३३, ४३४, ४३५, ४३६, दिनांक ३०/१२/२००८ व फेरफार क्रमांक ५०१, ५०२, ५०४, ५०५, दिनांक २३/०५/२०११ अन्वये खरेदीने मे.बिग स्पेस रिअल्टी प्रा.लि. तर्फे डायरेक्टर श्री.दिलीपकुमार फुलचंद जैन यांचे नावे दाखल झालेल्या आहेत. सद्यस्थितीत सदर स.नं. च्या ७/१२ च्या कब्जेदार सदरी बिगस्पेस रिअल्टी एल.एल.पी तर्फे डायरेक्टर श्री.दिलीपकुमार फुलचंद जैन यांचे नाव दाखल असल्याचे दिसून येते. तसेच स.नं. २०, २१, २२, २३, २६, ३०, ३१, ३६, ३७, ३८, ४१, ४३, ४४, ४५, ४६, ४७, ४८, ५०, ५४, ५५, ५६, ५७ च्या जमिनी संबंधित शेतकरी खातेदार यांचे नावे दाखल असल्याचे दिसून येते.

सदर प्रकरणी मे.बिग स्पेस रिअल्टी प्रा. लि. यांनी सन २००८ मध्ये बनावट दस्तऐवज सादर करुन जमीन अकृषिक करुन घेतल्याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त नसल्याने चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दिग्रस ते दारव्हा (जि.यवतमाळ) या रस्त्याच्या कामासाठी अवैधरित्या गौण खनिज उत्खनन करण्यात येत असल्याबाबत

**(३४) * १३७४३६ श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिग्रस ते दारव्हा (जि.यवतमाळ) या रस्त्याच्या दिग्रस तालुक्यातील सुरू असलेल्या कामासाठी जेसीबीच्या सहाय्याने नियमबाह्यरित्या परिसरातील टेकड्या फोडून लाखो ब्रास गौण खनिजांचे उत्खनन करुण टिप्परच्या साहाय्याने अहोरात्र वाहतूक सुरु असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार अवैधरित्या गौण खनिज उत्खनन करणाऱ्या कंत्राटदारावर व संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

दिग्रस ते दारव्हा या रस्त्याच्या कामाकरीता लागणा-या खनिजाचे उत्खनन कंत्राटदारामार्फत महाराष्ट्र शासनाच्या प्रचलित नियमानुसार रितसर परवानगी घेवूनच करण्यात आले असून नियमबाहय कोणतेही खोदकाम करण्यात आलेले नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिन्नर (जि.नाशिक) येथील ग्रामीण रुग्णालयात ट्रॉमाकेअर सेंटर सुरु करण्याबाबत

**(३५) * १३८८४३ श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिन्नर (जि.नाशिक) तालुक्यात सर्वाधिक अपघात होत असुन अपघातांमध्ये मृत पावणाऱ्यांची संख्या जास्त असल्यामुळे ग्रामीण रुग्णालयात ट्रॉमाकेअर सेंटर सुरु करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांचेकडे दिनांक ७ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण रुग्णालय सिन्नर येथे ट्रॉमाकेअर सेंटर सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) ट्रामा केअर युनिट हे रुग्णालयास संलग्न असते. सिन्नर येथील ग्रामीण रुग्णालयाचे बांधकाम पूर्णत्वास आले असून सदर इमारत अदयाप आरोग्य विभागास हस्तांतरीत झालेली नाही. व त्यामुळे येथील रुग्णालय सुरु झालेले नाही. सन २०११ च्या लोकसंख्येवर जोड बृहत आराखडया तयार करण्याची

कार्यवाही आरोग्य सेवा संचालनालयस्तरावरुन सुरु असून या ठिकाणी ट्रामा केअर युनिट सुरु करण्याबाबतच्या मागणीचा निकषानुसार जोड बृहत आराखडयामध्ये समावेश करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात शेतकऱ्यांच्या झालेल्या आत्महत्या

**(३६) * १३४८८१ श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.भारत**

**भालके (पंढरपूर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), डॉ.राहूल पाटील (परभणी), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकरी आत्महत्येस प्रतिबंध घालण्यासाठी शेतकरी स्वावलंबी मिशन सन्मान योजना राबविण्यात येत असतानाही धरणातील खालावत चाललेली भूजल पातळी, नापिकी, कर्जबाजारीपणा, शेतमालाला नसलेला योग्य भाव, दुष्काळावर उपाययोजना करण्यास आलेले अपयश इत्यादी कारणामुळे माहे जानेवारी, २०१५ ते डिसेंबर, २०१८ या चार वर्षाच्या कालावधीत सुमारे ११९९५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे जानेवारी ते मार्च, २०१९ या कालावधीत ६१० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून त्यापैकी १९२ आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना मदतीसाठी पात्र ठरविण्यात आले असून ३२३ आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे कुटुंबीय अपात्र झाल्याने मदतीपासुन वंचित राहिल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आत्महत्याप्रकरणाची नोंदणी करताना शेतकऱ्यांच्या मालकीची जमीन आहे की नाही यांची नोंदणी करण्यात येत असल्याने महिला, आदिवासी व दलित यांची नोंदणी या आकडेवारीत होत नसून त्यांची नोंदणी इतर या कॉलममध्ये होत असल्याने राज्यातील इतर या कॉलममध्ये होणाऱ्या आत्महत्यांच्या नोंदणीत ९४ टक्क्यांनी मोठी वाढ होऊन अनेक आत्महत्याग्रस्त कुटुंबिय नुकसान भरपाईपासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार चौकशीच्या अनुषंगाने शेतकरी आत्महत्या रोखण्यासह शासकीय मदतीतील निकषांत शिथिलता आणून वंचित आत्महत्याग्रस्त कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) सन २०१५ ते सन २०१८ या कालावधीत राज्यात एकूण १२०२१ शेतकरी आत्महत्यांची प्रकरणे निदर्शनास आली असून त्यापैकी ६८८८ प्रकरणे निकषात बसत असल्यामुळे जिल्हास्तरीय समितीमध्ये पात्र ठरविण्यात आलेली आहेत. एकूण पात्र प्रकरणांपैकी ६८४५ प्रकरणी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना रू.१.०० लक्ष ची मदत देण्यात आली आहे.
(२) माहे जानेवारी ते मार्च, २०१९ या कालावधीत ६१० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून त्यापैकी १९२ प्रकरणे जिल्हास्तरीय समितीमध्ये पात्र ठरली आहेत. ९६ प्रकरणे निकषात बसत नसल्यामुळे अपात्र ठरवली आहेत. पात्र ठरलेल्या १९२ प्रकरणांपैकी १८२ प्रकरणी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना मदत देण्यात आली आहेत. तसेच ३२३ प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित आहेत.
(३) व (४) दिनांक २७ फेब्रुवारी २००६ च्या शासन निर्णयानुसार मृत शेतकऱ्यांच्या वारसांना मदत देण्याबाबत चौकशी करतेवेळी सदर व्यक्ती शेतकरी होता किंवा कसे याबाबत निकष सुधारण्यात आले असून मृत व्यक्तीच्या कुटुंबातील कोणतीही व्यक्ती शेतजमीन धारण करीत असेल तर सदर व्यक्तीस शेतकरी म्हणून गृहीत धरण्यात येते, मृत शेतकऱ्यांच्या वारसांना मदत देण्याबाबत चौकशी करताना सदर व्यक्तीने शेतीसाठी, शेती सुधारण्यासाठी कर्ज घेतले होते किंवा कसे याबाबत निकष सुधारण्यात आले असून मृत व्यक्तीच्या कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीने राष्ट्रीयकृत बँका, सहकारी बँका, सहकारी पतसंस्था व मान्यताप्राप्त सावकार यांचेकडून कर्ज घेतले असल्यास व सदर कर्जाची परतफेड न करता आल्यामुळे कर्जाचे हप्ते प्रलंबित असल्यास सदर व्यक्तीस मदतीसाठी पात्र ठरविण्यात येते,
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्हयातील जीएमसी रुग्णालयामध्ये विना तपासणी रुग्णाला रेबीजचे इंजेक्शन दिल्याबाबत

**(३७) * १३८४२२ श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयातील जीएमसी रुग्णालयामध्ये उपचारासाठी गेलेल्या एका रुग्णाला वैद्यकीय अधिका-यांने विचारपूस न करता रेबीजचे इंजेक्शन दिल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, त्यानुसार रुग्णाला रेबीजचे इंजेक्शन दिलेल्या वैद्यकीय अधिका-यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, हे खरे आहे. दिनांक २४/०४/२०१९ रोजी आंतरवासीता पदावर काम करणाऱ्या प्रशिक्षणार्थी डॉक्टरांकडून अनावधानाने रुग्णास ॲन्टी रेबीज इंजेक्शन देण्यात आले आहे.

(२) होय.संबंधित विभागप्रमुखांच्या स्तरावर चौकशी करण्यात आली आहे. चौकशीत आंतरवासीता पदावर काम करणारे प्रशिक्षणार्थी डॉक्टर हे प्रत्यक्षपणे तर कनिष्ठ निवासी डॉक्टर व अधिपरिचारक हे अप्रत्यक्षपणे सदर घटनेस जबाबदार असल्याचा निष्कर्ष नोंदविण्यात आला आहे.

(३) प्रशिक्षणार्थी डॉक्टरांचा प्रशिक्षण कालावधी वाढविण्यात आला आहे. घटनेस अप्रत्यक्ष जबाबदार असणाऱ्यांचे २ दिवसांचे वेतन कपात करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भुसावळ (जि.जळगांव) येथे शासकीय मत्स्य विद्यालय स्थापन करण्याबाबत

**(३८) * १४१३१६ श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भूसावळ (जि.जळगांव) येथे शासकीय मत्स्य विद्यालय स्थापन करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी कृषी व पदुम विभागाकडे सन २०१५ पासून मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार व लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार भूसावळ येथे शासकीय मत्स्य विद्यालय स्थापन करण्याबाबत तसेच या विद्यालयास जिल्हाधिकारी कार्यालयाकडून जागा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) होय.

(२), (३) व (४) भुसावळ जि.जळगांव येथे नविन मत्स्य विज्ञान महाविद्यालय स्थापन करण्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठास देण्यात आले असून, तसा प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झाल्यावर याविषयी पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## इळये वरंडवाडी ते जामसंडे - वळकू पाटथर वाडी (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) येथे पूल बांधण्याबाबत

**(३९) * १३५७१९ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इळये वरंडवाडी ते जामसंडे-वळकू पाटथर वाडी (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) येथे पुलाचे बांधकाम करण्याबाबत परिसरातील ग्रामस्थांनी गत २५ वर्षांपासून सातत्याने मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, पालकमंत्री, सिंधुदुर्ग, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कणकवली, सार्वजनिक बांधकाम उप विभाग, देवगड यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुलाच्या बांधकामास यापूर्वीच मंजुरी देण्यात आली असूनही सदर पुलाच्या उभारणीचे काम अद्यापपर्यंत सुरु करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पुलाअभावी परिसरातील ग्रामीण जनतेची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असून अद्यापि सदरहू पुलाचे बांधकाम सुरु न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याप्रकरणी चौकशी करून या पुलाच्या बांधकामास सुरुवात करून तातडीने काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) मंजूर प्रशासकीय मान्यता किमंतीपेक्षा पूलाची किमंत जास्त होत असल्याने सदर काम हाती घेण्यात आले नाही.

(४) मागणी असलेल्या ठिकाणी पूलाची लांबी सुमारे २२०.० मी. असून प्रस्तावित पूल हा तारामुंबरी खाडीवर आहे. पूलाचे पाया व इतर डिसाईनसाठी चाचणी रंध्रे आवश्यक असून चाचणी रंध्रे घेणे कामाचे ठेकेदारी निश्चित करुन कामाचे आदेश दिले आहेत. सदर चाचणी रंध्रे घेऊन पूलाचे संकल्पन संकल्प चित्र मंडळाकडून घेणेबाबत कार्यवाही करणेत येत आहे. सविस्तर नकाशे प्राप्त झाल्यावर पूलाचे बांधकाम,पूलाचे जोडरस्ते व त्यासाठी लागणाऱ्या जागेचे भूसंपादन यांचे अंदाजपत्रक तयार करुन लवकरात लवकर काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगली राज्यमार्गावरील मोगराळे घाटातील 'एस' आकाराच्या वळणावर होत असलेल्या अपघाताबाबत

**(४०) * १४०३०० श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली राज्यमार्गावरील दुधेबाची पासून जवळच असलेल्या मोगराळे घाटातील 'एस' आकाराच्या वळणामुळे या ठिकाणी वारंवार मोठे अपघात घडत असून या अपघातात अनेक नागरिकांचा मृत्यु झाल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दहिवडी वरुन फलटणकडे जाताना मोगराळे घाटामध्ये 'एस' आकाराच्या वळणावर वाहने रस्त्याच्या तीव्र उतारावरुन भरधाव वेगाने येत एकमेकांना ओव्हरटेक करीत असल्याने व रस्त्यावरील सुरक्षाकठडाही तुटल्याने अपघाताचा धोका वाढला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने या घाटातील 'एस' आकाराच्या वळणावर अपघात घडू नये म्हणून उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

प्रश्नांकित अहमदनगर मठेवडगाव काष्टी दौड बारामती फलटण दहीवडी मायणी विटा तासगाव सांगली अंकली रस्ता रा.मा.६० असा आहे.

(२) सदर रस्ता मोगराळे घाटामध्ये 'एस' आकाराच्या वळणाचा आहे. माहे मार्च २०१९ ते माहे मे २०१९ दरम्यान एक अपघात मोटारसायकल स्वाराच्या निष्काळजीपणामुळे झाल्याचे पोलीस दप्तरी नोंद आहे.

(३) व (४) सद्य:स्थितीत घाट लांबीतील संरक्षण कठडे सुस्थितीत आहेत. वाहतूकीच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून सदर रस्ता सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.

प्रश्नांकीत राज्यमार्ग ६० हा राष्ट्रीय महामार्ग क्र.१६५ असा घोषित झाला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात साथीच्या व जलजन्य आजारांचा प्रादुर्भाव वाढल्याबाबत

**(४१) * १३५९५६ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात डेंग्यु, हिवताप, चिकनगुनीयासह इतर किटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव वाढल्यामुळे मागील तीन वर्षामध्ये डेंग्यु या आजाराने एकूण १६४ रूग्णांचा तर हिवतापाने ५९ रूग्णांचा मृत्यू झाला असल्याचे दिनांक २७ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, राज्यात कॉलरा, गॅस्ट्रो, अतिसार, कावीळ, विषमज्वर या जलजन्य आजारांची सन २०१५ मध्ये ५१७५, सन २०१६ मध्ये ६०१२, सन २०१७ मध्ये ८५४९, सन २०१८ मध्ये १४०४ असे एकूण २११४० नागरीकांना लागण होवुन ४९ नागरीकांचा मृत्यु झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील साथीच्या व जलजन्य आजारांच्या नियंत्रणासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अशत: खरे आहे.

२०१६ ते २०१८ या ३ वर्षाच्या कालावधीमध्ये डेंग्यूमुळे राज्यात १६८ जणांचा मृत्यू झाल तर याचा कालावधीत हिवतापामुळे ५९ जणांचा मृत्यू झाला.

तथापी राज्यात डेंग्यूचा प्रादुर्भाव वाढत असला तरी हिवताप व चिकनगुनियाचे रुग्णांमध्ये घट होताना दिसत आहे.

(२) हे अशत: खरे आहे.

राज्यात जनजन्य आजारांचा उद्रेकांचा तपशील पुढील प्रमाण आहे. हत्तीरोग संक्रमण पडताळणी सर्वेक्षणात FTS किट्स व्दारे तपासणीत दुषित आढळुन आलेल्या हत्तीरोग दुषित ६ विद्यार्थ्यास हत्तीरोगाचा १२ दिवसाचा हत्तीरोग उपचार देण्यात आलो आहे. तसेच यापुर्वी सन २००४ पासुन दरवर्षी हत्तीरोग दुरिकरणाकरिता एक दिवसीय सामुदायिक औषधोपचार माहिती राबविण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील गावांमध्ये चक्रीवादळ निवारा केंद्र उभारण्याबाबत

**(४२) * १४०१९२ श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या पश्चिम किनारपट्टीवरील जिल्ह्यांमध्ये राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारा प्रकल्प शासनामार्फत राबविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पांतर्गत रायगड जिल्ह्यातील विचुंबे (ता.पनवेल), चाणजे (ता.उरण), किहिम व गोंधळपाडा (ता.अलिबाग), मुरूड व हाफिजखार (ता.मुरूड), श्रीवर्धन व दिघी (ता.श्रीवर्धन) आणि म्हसळा (ता.म्हसळा) या ९ गावांमध्ये चक्रीवादळ निवारा केंद्र उभारण्यासाठी ४ वर्षापूर्वी जिल्हा प्रशासनाने राज्य शासनाकडे प्रस्ताव सादर केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रायगड जिल्ह्यातील ९ प्रस्तावांपैकी श्रीवर्धन तालुक्यातील दिघी येथे चक्रीवादळ निवारा केंद्र उभारण्याकरीता राज्य शासनाने ४ कोटी १० लाख ६४ हजार ८७० रूपयांचा निधी मंजूर केला असून उर्वरीत ८ गावांमध्ये

चक्रीवादळ निवारा केंद्र उभारणीचे प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रायगड जिल्ह्यातील उर्वरित ८ गावांमध्ये चक्रीवादळ निवारा केंद्र उभारणीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय.

(२), (३), (४), (५) रायगड जिल्हयातील राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण केंद्र उभारण्यासाठी प्राप्त झालेल्या सर्व प्रस्तावांची छानणी करण्यात आली असून, त्यापैकी दिघी (ता.श्रीवर्धन) व बोर्ली (ता.मूरुड) या ठिकाणांची निवारा केंद्र उभारण्यासाठी निवड करण्यात आली. दिघी येथील निवारा केंद्रासाठी आतापर्यंत ७ वेळा निविदा मागविण्यात आल्या होत्या. परंतु एकही निविदा प्राप्त झालेली नाही. दिघी व बोर्ली या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. दिघीसाठी निविदा प्राप्त झाली नसल्यामुळे शासनाने चारही जिल्हयातील प्रस्तावित ११ ठिकाणी बहुउद्देशिय चक्रीवादळ निवारा केंद्र उभारण्याकरीता एकत्रित निविदा प्रक्रिया राबविण्यास मान्यतादेण्याची जागतिक बँकेस विनंती केली आहे.

-----------------

## सायन-पनवेल महामार्गावरील खारघर येथील टोलनाक्याच्या कंत्राटदाराने टोलवसूलीची रक्कम शासनाकडे जमा न केल्याबाबत

**(४३) * १३५४३४ श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.भारत भालके (पंढरपूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर),**

**श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सायन-पनवेल महामार्गावरील खारघर येथील टोलनाक्याचे कंत्राट दिलेल्या डीआर सर्विसेस यांनी दर आठवड्याला १.०८ कोटी रुपये एवढी रक्कम शासनाकडे जमा करावी असा करार कंत्राटदार व शासन यांच्यात करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंत्राटदाराने माहे ऑक्टोबर,२०१८ पासून शासनाला देय असलेली रक्कम दिली नसल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून शासनाची देय रक्कम थकवणाऱ्या कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

माहे डिसेंबर, २०१८ मध्ये सायन-पनवेल महामार्गावरील पथकर वसुलीचे काम मे.डी.आर.सर्विसेस यांना देण्यात आले होते. निविदेतील अटी व शर्तीनुसार कंत्राटदाराने प्रत्येक आठवड्यास रुपये १,८२,९५,८९३/- इतकी रक्कम शासनास जमा करणे आवश्यक होते.

तथापि, कंत्राटदार सदर रक्कम विहित कालावधीत जमा करीत नसल्याने त्यांचे कंत्राट रद्द करण्यात आले असून दिनांक २.०४.२०१९ रोजी पथकर नाक्याच्या ताबा घेण्यात आलेला आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणी मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार लवाद गठीत करण्यात आला असून लवादाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तिरोडा (जि.गोंदिया) तालुक्यात अवैध रेती उपसा होत असल्याबाबत

**(४४) * १४०४५६ श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिरोडा (जि.गोंदिया) तालुक्यात ३ रेतीघाट असून कोणत्याही रेतीघाटावर सीसीटीव्ही लावण्यात आलेला नसल्याने जेसीबी व पोकल्यांड मशिनच्या सहाय्याने रेतीचा अवैध उपसा केला जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यात अवैध रेतीची वाहतूक करणाऱ्या वाहनांवर जीपीएस द्वारे देखरेख ठेवली जात नसून जप्ती केलेली वाहने अधिकाऱ्यांच्या संगनमताने सोडून दिल्या जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त तालुक्यात अवैध रेती उपसा करणाऱ्यांवर तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात राबविलेल्या हायब्रीड ॲन्युईटी योजनेत झालेला गैरव्यवहार

**(४५) * १३५५२६ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.अजित पवार (बारामती), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिलीप सोपल (बार्शी),**

**श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात हायब्रीड ॲन्युईटी योजनेतून बांधल्या जात असलेल्या रस्त्यावर पुन्हा दुसऱ्या योजनेतून कामे दाखवून परस्पर देयके काढल्यामुळे राज्यातील १९६ रस्त्यांच्या कामांची तपासणी करण्याचा निर्णय सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार या प्रकरणातील संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही. तथापि दि.१४ फेब्रुवारी २०१९ रोजीच्या सचिव (रस्ते) यांच्या अर्धशासकीय पत्रान्वये हायब्रीड ॲन्युईटी कामाच्या वावाची अन्य योजनेतील कामाच्या वावामध्ये द्विरुक्ती झाली आहे किंवा कसे हे तपासण्याचे निर्देश दिले आहेत तसेच इतर योजनेतून सुरु असलेल्या कामांची देयके अदा केल्यानंतर त्याच कामाची देयके हायब्रीड ॲन्युईटी योजनेतून अदा होत नाहीत याबाबतची खात्री करण्याचे निर्देश दिले आहेत.

(२), (३) व (४) हायब्रीड ॲन्युईटी योजनेतुन अन्य कामांची देयके अदा करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसई (जि.पालघर) तालुक्यातील दगडखदानीवर कारवाई करण्याबाबत

**(४६) * १३७८८४ श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) तालुक्यात दगडखदानीचे परवाने शासनाने बंद केले असतानाही विरार (पुर्व) चंदनसार येथील सर्वे क्र.३५९ येथे असलेला डोंगर दगडखदान माफियांनी पूर्णपणे नष्ट केला असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या दगडखदानी अनधिकृत उत्खनन करीत असल्याने शासनाच्या लाखो रुपयांच्या महसूलाचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार अनधिकृत उत्खनन करणाऱ्या संबंधित दगडखदानीविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

मौजे-चंदनसार, ता.वसई, जि.पालघर येथील सर्व्हे क्र.३५९ मधील क्षेत्र ३७४.७६ हेक्टर असून त्याचा वैधानिक दर्जा राखीव वन असा आहे. वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत सदर सर्व्हे क्रमांकामधील ०.८० हेक्टर वनक्षेत्र दगडखदानीसाठी वळती करण्यास केंद्र शासनाच्या दिनांक १४/११/२००६ रोजीच्या आदेशानुसार परवानगी प्राप्त झाली होती. तथापि, केंद्र शासनाने दिनांक १८/०५/२०१२ रोजीच्या पत्रान्वये दगडखानी करीता पर्यावरण विषयक मंजूरी घेणे आवश्यक असल्याचे निर्देश दिले आहेत. प्रकल्प यंत्रणेने पर्यावरण विषयक मंजूरी प्राप्त केली नसल्याने उपवनसंरक्षक, ठाणे यांनी दिनांक २२/०५/२०१७ रोजीच्या पत्रान्वये सदर दगडखदान बंद करण्याचे निर्देश दिले आहेत.

(२) प्रकल्प यंत्रणेने वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत प्राप्त झालेल्या मान्यतेनुसार पर्यायी वनीकरण, नक्त वर्तमान मूल्य व सुरक्षा क्षेत्र इ. बाबीपोटी विहित रक्कमेचा भरणा केला आहे. तसेच प्रकल्प यंत्रणेकडून प्रचलित नियमानुसार स्वामित्व शुल्काची वसूली करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) व (५) केंद्र शासनाच्या निर्देशानुसार प्रकल्प यंत्रणेने पर्यावरण विषयक मान्यता प्राप्त केली नसल्याने दिनांक २२/०५/२०१७ पासून सदर दगडखदान बंद करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

-----------------

## कोढणपुर फाटा ते शिवापुर (ता.हवेली, जि.पुणे) या रस्त्याच्या कामाबाबत

**(४७) * १४१४६० श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोढणपुर फाटा ते शिवापुर (ता.हवेली, जि.पुणे) या रस्त्याच्या निकृष्ट दर्जाच्या कामामुळे सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे यांना रस्त्याचे १० महिन्यात ३ वेळा काम करावे लागले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे काम सुरु असल्याने दिनांक २२ मे, २०१८ रोजी स्थानिक पदाधिकाऱ्यांनी सदर काम बंद पाडले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर काम पुर्ण झाल्यानंतर चारच महिन्यात या रस्त्याला पुन्हा खड्डे पडल्याचे दिनांक २८ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करून या रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

प्रश्नांकीत रस्ता डोणजे कोंढणपूर शिवापूर हा प्रजिमा ३६ असा आहे. मे २०१८ मध्ये पावसाळयापुर्वी २.०० कि.मी. लांबीमध्ये डांबरी पृष्ठभागावरील खड्डे भरण्यात आले, त्यानंतर हायब्रीड ॲन्युइटी अंतर्गत मजबुतीकरणाचे काम सुरु असून प्रगतीपथावर आहे.

(२) दिनांक २२ मे, २०१८ रोजी स्थानिक पदाधिकाऱ्यांनी सदर कामावर भेट देऊन काम व्यवस्थित करणे विषयी सूचना केलेल्या होत्या सदरचे काम आज रोजी पर्यंत सुस्थितीत आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अलिबाग (जि.रायगड) येथील जिल्हा रुग्णालयात सोनोग्राफी सेंटर सुरु करण्यासह शस्त्रक्रियेसाठी आवश्यक असलेले साहित्य उपलब्ध करुन देण्याबबात

**(४८) * १३७९९७ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) येथील जिल्हा सामान्य रूग्णालयात अनेक भागातून दररोज सुमारे ६०० पेक्षा जास्त गरीब गरजू रूग्ण तपासणीसाठी येत असून या रूग्णालयात नियमितपणे प्रसूतीसाठी येणाऱ्या महिला, अपघातात जखमी झालेले रूग्ण अशा सुमारे ८० पेक्षा जास्त रुग्णांना सोनोग्राफी करावी लागत असताना स्वतंत्र सोनोग्राफी सेंटर मधील तज्ञ मागील ७ महिन्यापासून नसल्यामुळे सोनोग्राफी सेंटर बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, या रुग्णालयात फॅक्चर झालेल्या रूग्णांसाठी आवश्यक असलेली पट्टी (रॉड) अथवा वॉल इत्यादी अत्यावश्यक साहित्य वेळीच उपलब्ध होत नसल्यामुळे अशा रूग्णांवर शस्त्रक्रियेसाठी ८ ते १० दिवस थांबावे लागत असल्याने रुग्णांना मुंबई किंवा खाजगी रूग्णालयात उपचार घ्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, याबाबतची चौकशी शासनाने केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार या रुग्णालयातील सोनोग्राफी सेंटर सुरु करण्यासह शस्त्रक्रियेसाठी आवश्यक असलेले साहित्य व अन्य सोयीसुविधा तात्काळ उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा रुग्णालय, अलीबाग येथील क्ष-किरणतज्ञ यांची सामान्य रुग्णालय, ठाणे येथे बदली झाल्याने माहे जून,२०१८ ते माहे डिसेंबर, २०१८ या कालावधीत सदर पद रिक्त असल्याने रुग्णांची गैरसोय झाली होती.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) जिल्हा रुग्णालय, अलीबाग येथे दिनांक १.१.२०१९ पासून क्ष-किरणतज्ञ कार्यरत आहे. सोनोग्राफी सेंटरसाठी आवश्यक साहित्य पुरेशा प्रमाणात उपलब्ध असल्याने रुग्णांना सोनोग्राफी सेवा नियमितपणे दिली जात आहे.

तसेच शस्त्रक्रीयेकरीता आवश्यक साहित्यसामुग्री व सोयीसुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्ह्यातील रेती कंत्राटदार नियमाप्रमाणे मंजूर केल्यापेक्षा अधिक प्रमाणात रेती उपसा करत असल्याबाबत

**(४९) * १४००८३ डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यातील रेती कंत्राटदार अधिकाऱ्यांच्या संगनमताने नियमाप्रमाणे मंजूर केल्यापेक्षा अधिक प्रमाणात शासकीय नियमांच्या आधारे रेती उपसा करत असून उपसा केलेली अतिरिक्त रेती साठवून (डंपिंग) ठेवत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, साठा केलेल्या रेतीतून दररोज तेवढीच रेती बाहेर विक्रीला गेल्यानंतरही तेवढाच साठा कायम राहत असल्याने सातत्याने रेती उपसा सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत सबंधिताकडे वारंवार तक्रारी करूनही उक्त कंत्राटदारांवर कोणतीही कारवाई केली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करून संबंधित कंत्राटदार तसेच अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्हयातील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(५०) * १३८४९३ श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नायगांव (जि.नांदेड) तालुक्यातील राहेर-हुस्सा-डोंगरगाव, कुटुंर-सालेगाव-दुगाव घुंगराळा-रुई-बळेगाव या रस्त्यांची प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे दुरवस्था झाल्याने नागरिकांना अनेक गैरसोयींना सामोरे जावे लागत असल्याचे दिनांक २० मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच उमरी तालुक्यातील माळकोंढा-भापेगाव-इजतगाव-बळेगाव-महाटी-बिजेगाव-कोरेगाव, जोडरस्ता शिरुर, सोमठाणा-बितनाल-सावरगाव मोखंडी-बोपी- तुराटी या रस्त्यांची व धर्माबाद तालुक्यातील पिंपळगांव-सालेगाव, धर्माबाद ते बेल्लूर (बु.) चिंचोली-बेल्लूर (खु.) जाफलापूर व नायगाव (ध) या रस्त्यांची दुरवस्था झाल्यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उमरी व नायगांव या तालुक्यांना जोडणाऱ्या कुंटुर ते इकळी माळ या रस्त्यांचे काम निकृष्ट दर्जाचे करण्यात आले असुन किरंमगाव (ता.हिमायतनगर, जि.नांदेड) येथील ग्रामस्थांनी रस्त्याच्या मागणीसाठी लोकसभा निवडणूकीवर बहिष्कार टाकण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात चौकशी करून नांदेड जिल्हयातील या रस्त्यांची दुरुस्ती करून किरंमगाव या गावासाठी रस्ता बांधण्याबाबत व कुंटुर ते इकळी माळ या रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्यावर तसेच रस्त्यांच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

प्रश्नाधीन रस्त्यावर सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत खड्डे भरण्यात येऊनसुध्दा वाळूच्या अवजड वाहतुकीमुळे रस्ते क्षतिग्रस्त होत आहेत.

(३) हे खरे नाही.

प्रश्नाधीन रस्त्याच्या गुणवत्तेविषयक दक्षता व गुणनियंत्रण प्रयोगशाळेच्या चाचणी अहवालातील निष्कर्ष समाधानकारक आहेत. किरमगाव येथील ग्रामस्थांनी रस्त्याच्या मागणीसाठी लोकसभा निवडणूकीवर बहिष्कार टाकण्याचा इशारा दिला होता, हे खरे आहे. तथापी, या रस्त्यावरील मंजुर कामाची वस्तुस्थिती सार्वजनिक बांधकाम उपविभाग, हिमायतनगर यांनी निदर्शनास आणून दिल्यानंतर ग्रामस्थांनी मतदान केले आहे.

(४) किरमगाव येथील रस्त्यांचे एकूण लांबीपैकी १.०० किमी लांबीचे काम निविदास्तरावर आहे. उर्वरित २.०० किमी लांबीचे काम मंजुरी, प्राधान्यक्रम व निधिच्या उपलब्धतेनुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

कुंटूर ते इकळामाळ रस्त्यांचे काम निकषानुसार करण्यात येत असल्याने संबंधित अधिका-याविरूध्द कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मत्स्य व्यावसायिकांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(५१) * १३५६९७ श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात यावर्षी मत्स्यदुष्काळ पडल्यामुळे माशांच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट झाल्यामुळे राज्यातील पारंपारिक मत्स्यव्यावसायिकांवर आर्थिक संकट ओढवल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंधुदुर्ग जिल्हयात जेलीफिशचे झालेले आक्रमण, वाईट हवामान आणि परप्रांतीय हायस्पीड ट्रॉलर्सकडून एलईडी पध्दतीने होणारी मासेमारी यामुळे जिल्ह्याच्या किनारपट्टीवरील मासळी उत्पादनात मोठी घट झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सिंधुदुर्ग जिल्ह्यासह संपूर्ण राज्यात मत्स्यदुष्काळ जाहीर करून मत्स्य व्यावसायिकांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) हे खरे नाही.

राज्याचे मागील २ वर्षाचे मत्स्योत्पादन खालील प्रमाणे आहे.

| **वर्ष** | **सागरी मत्स्यउत्पादन** | **सिंधुदूर्ग जिल्हयाचे मत्स्यउत्पादन** |
|---|---|---|
| २०१७-१८ | ४७४९९२ | २०५८२ |
| २०१८-१९ | ४६७००० | १९०५४ |

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राष्ट्रीय फलोत्पादन विकास अभियानातील गैरप्रकार

**(५२) * १३९८४४ श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.भारत भालके (पंढरपूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय फलोत्पादन अभियान (एनएचएम) मधून अनुदानाचे प्रस्ताव लॉटरी पध्दतीने न काढता त्यासाठी ऑनलाईन अर्ज करुन ऑफलाईन प्रस्ताव कृषी विभागास सादर केल्यानंतर कागदपत्रांची तपासणी केल्यावर इरादापत्रे

(एलओआय) देण्यापुर्वी कृषी विभागाकडून प्रत्यक्ष जागेवर मोका तपासणी केल्यानंतरही तपासणीची तारीख व इरादपत्रे ऑनलाईनने कळविले जात नसल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी विभागाकडून इरादापत्र पाठविले जात असून त्यात तांत्रिक निकष नसल्यामुळे प्रत्येक मोका तपासणीत अनेक त्रूटी काढल्या जात असून, अनुदान किती द्यावे, याची शिफारस मोका पथकाकडून होत असल्याने, त्याची सरबराई शेतकऱ्यांनी केल्यावर अनुदान प्राप्त होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कृषी खात्याच्या संकेत स्थळावर एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानासंदर्भातील मार्गदर्शक सूचना, तांत्रिक निकष, परिपत्रके, शासकीय आदेश व निधी वाटपाची स्थिती याबाबतची माहिती शेतकऱ्यांना देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानातील कामकाजासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(५) असल्यास, त्यानुसार संबंधितंवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयदत्त क्षीरसागर :** (१) अंशत: खरे आहे.

(अ) मोठ्या अनुदानाचे सर्व प्रस्ताव लॉटरी पध्दतीने काढले जातात.

(ब) योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रस्तावाला पूर्वसंमती देण्यापूर्वी प्रकल्प नवीन उभारणी करणार असल्याबाबतची खात्री करण्यासाठी प्रकल्प स्थळाची मोका तपासणी करण्यात येते.

(क) मोका तपासणीची तारीख व वेळ ऑनलाईन कळविली जात नसून ती संबंधितास क्षेत्रीय कार्यालयाकडून स्थानिक कर्मचाऱ्यांमार्फत कळविण्यात येते. तसेच इरादा पत्रे प्रलंबित ठेवल्याचे निदर्शनास आलेले नाही .

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानाच्या मार्गदर्शक सूचना, तांत्रिक निकष कृषी विभागाच्या www.krishi.maharashtra.gov.in तसेच www.mahanhm.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच शासकीय परिपत्रके, शासकीय आदेश, निधी वाटपाची स्थिती याबाबत वेळोवेळी संबंधित लाभार्थी शेतकरी, संस्था व कार्यालये यांना कळविण्यात येते.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंधेरी (मुंबई) येथील एमआयडीसी परिसरातील राज्य कामगार विमा रुग्णालयाला लागलेली आग

**(५३) * १३५६३५ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी (मुंबई) येथील एमआयडीसी परिसरातील राज्य कामगार विमा रुग्णालयाच्या इमारतीला दिनांक १७ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास लागलेल्या आगीत ८ जणांचा मृत्यू तर, १४२ हून अधिक व्यक्ती जखमी झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयाचे मागील दहा वर्षापासून दुरुस्तीचे काम सुरु असुन ठेकेदार कंपनीच्या कामगाराचे एसीच्या वेल्डिंगचे काम करत असताना वेल्डींगची ठिणगी पडून आग लागली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी हॉस्पिटल प्रशासनासह ठेकेदार कंपनी एनबीसीसी ही जबाबदार असून याप्रकरणी अनेक कामगारांनी यापूर्वीही तक्रार केल्या असुन रुग्णालयामध्ये अग्निशमन दलाच्या नियमांचे सर्रासपणे झालेले उल्लंघन याबाबत तक्रार करुनही प्रशासनाने दुर्लक्ष केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबईत आगीच्या घटना वाढत असून, त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर जीवीत हानी होत असताना सुरक्षेचे नियम रुग्णालयांकडून दुर्लक्षित करण्यात येत असून मुंबईत अनधिकृत असलेल्या नर्सिंग होममध्ये कोणतीही अग्निशमन यंत्रणा कार्यरत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार आगींना प्रतिबंध करण्याच्यादृष्टीने उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदर दुर्घटनेत १३ व्यक्ती मृत्यूमुखी पडले असून तसेच २७ गंभीर इजा व १५७ किरकोळ दुखापत झालेल्या होत्या.

(२) हे खरे आहे.

शासनाने अप्पर मुख्य सचिव, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे. समितीचा अहवाल प्रतिक्षेत आहे. तथापि, प्रथमदर्शनी आगीचे कारण वेल्डींग करत असताना तळमजल्यावरील रबरसील साहित्यावर ठिणगी पडून आग लागल्याचे कारण दिसून आले आहे.

(३) हे खरे आहे.

अग्निशमन दल, एम.आय.डी.सी., अंधेरी यांच्या प्राथमिक अहवालानुसार अग्निशमन विभागाच्या अद्यावत नियमांच्या अनुपालनाचा अभाव हे सदर घटनेचे कारण असल्याचे दिसून येते, अंतिम अहवाल शासनाने गठीत केलेल्या समितीकडून प्रतिक्षेत आहे..

(४) हे अंशत: खरे आहे.

(५) हे खरे आहे.

अंधेरी रुग्णालय हे केंद्र शासनाच्या अधिपत्याखाली राज्य कामगार विमा महामंडळ, नवी दिल्ली यांच्या सनियंत्रणाखाली आहे. सदर घटनेनंतर राज्य कामगार विमा योजना रुग्णालयामधील १२ रुग्णालयांमध्ये प्रत्यक्ष

आग प्रतिबंधक उपाययोजने विषयी प्रात्यक्षिक व प्रशिक्षण घेण्यात आलेले आहे. सर्व इमारतींच्या प्रत्येक मजल्यावर अग्निशमन प्रतिबंधक नळकांडी बसवण्यात आली आहे.

शासनाने दिनांक २७.१२.२०१८ अन्वये अप्पर मुख्य सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली अंधेरी आग दुर्घटने प्रकरणी समिती स्थापन केली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे शहरात प्रसूती दरम्यान महिलांच्या होणाऱ्या मृत्यूबाबत

**(५४) * १४०७६८ प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकण (जि.पुणे) येथील डॉ.अरगडे रुग्णालयामध्ये प्रसूतीनंतर सपना सुधीर पवळे या महिलेचा मृत्यू झाल्यामुळे तीन डॉक्टरांवर गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जनजागृतीचा अभाव, सकस आहार, उपचारांबाबतची उदासीनता व रुग्णालयांकडून उपचारांमध्ये होणाऱ्या दिरंगाईमुळे प्रसूतीदरम्यान महिलांचे मृत्यूचे प्रमाण वाढत असून पुण्यामध्ये सन २०१४-१५ मध्ये प्रसुतीदरम्यान मृत्यूचे प्रमाण ६६ व सन २०१८-१९ मध्ये ९४ आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन प्रसूतीदरम्यान महिलांच्या होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण कमी करण्याबाबत व उपचारामध्ये दिरंगाई करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

एका खाजगी रुग्णालयातून दुसऱ्या खाजगी रुग्णालयात संदर्भीत केल्यावर वाटेत मृत्यू झाल्या प्रकरणात चाकण पोलीस स्टेशन येथे दि.१०.०५.२०१९ रोजी एफआयआर क्र.०७७८ अन्वये गुन्हा दाखल झाला आहे.

(२) पुणे जिल्हयात सन २०१४-१५ मध्ये १०४ सन २०१८-१९ मध्ये १२८ मातामृत्यू प्रसुतीपूर्व व प्रसूतीपश्चात रक्तस्त्राव एक्लामशीया व जंतूदोष इत्यादी कारणामुळे झाले आहेत.

(३) जिल्हास्तरावर जिल्हा शल्यचिकित्सक यांचे अध्यक्षतेखाली तीन तज्ञ वैद्यकिय अधिकाऱ्यांची मातामृत्यू अन्वेषण समिती स्थापन करण्यात आली असून त्याचे मार्फत दरमहा जिल्हयात होणारे माता मृत्यूबाबत सखोल अन्वेषण केले जाते.

माता मृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी शासनाने खालील उपाययोजना केल्या आहेत.

• गरोदरपणामध्ये लवकरात लवकर नोंदणी (१२ आठवडयाची)

• नियमित पाठपुरावा करुन किमान ४ वेळा गरोदरपणी तपासणी.

• विशेष जोखमीच्या मातांचा तज्ञांमार्फत अतिरिक्त तपासणी

• सर्व प्रजननक्षम मातांना आठवडयाला एक या प्रमाणे वर्षाला ५२ लोहयुक्त गोळया देण्यात येतात.

• केंद्र शासनाच्या सुचनेनुसार राज्यात दर महिन्याच्या ९ तारखेला प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान राबविण्यात येते.

• सर्व गरोदर मातांना संस्थेमध्ये बाळंतपणासाठी प्रवृत्त करण्यात येते.

• बाळंतपणानंतर गरोदर मातांना किमान ३ दिवस आरोग्य संस्थेसमध्ये वास्तव्य करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

तसेच प्रस्तुत प्रकरणी उपचार करणाऱ्या डॉक्टरांवर चाकण पोलीस स्टेशनमध्ये दि.१०.०५.२०१९ रोजी एफआयआर क्र. ०७७८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात 'स्वाईन फ्ल्यू' आजाराला प्रतिबंध घालण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(५५) * १३४९३९ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.सुनिल केदार (सावनेर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.संजय पोतनीस (कलिना), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.संदीप नाईक (ऐरोली), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.सदा सरवणकर (माहिम),**

**श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १ जानेवारी ते १४ मे, २०१९ या कालावधीत १ हजार ५३६ रुग्णांना स्वाईन फ्ल्यूची बाधा झाली असून १५६ रुग्णांचा स्वाईन फ्ल्यूने मृत्यू झाला असून माहे मार्च व एप्रिल या दोन महिनांच्या कालावधीत ८४९ स्वाईन फ्लूचे रुग्ण आढळून आले असून ६१ पेक्षा जास्त रुग्णांचा मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माहितीनुसार राज्यात नाशिक, नागपूर, अहमदनगर, पुणे आणि कोल्हापूर मध्ये सर्वाधिक स्वाईन फ्लूचे रुग्ण आढळले असून नाशिकमध्ये १५, नागपूर १४, पुणे ६, कोल्हापूर व मुंबईत २, अहमदनगर मध्ये १ रुग्णांचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दरवर्षी माहे एप्रिल ते मे या महिन्यात राबविण्यात येणाऱ्या लसीकरण मोहिमेत गरोदर माता, मधुमेह, उच्च रक्तदाब असलेल्या व्यक्ती, ज्येष्ठ नागरिक, लहान मुले व आरोग्य कर्मचाऱ्यांना मोफत देण्यात येणारी लस उपलब्ध नसल्यामुळे स्वाईन फ्ल्युच्या रुग्णांना प्राण गमवावे लागले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबतची चौकशी करुन स्वाईन फ्ल्यूचा फैलाव होवू नये व वाढत्या स्वाईन फ्लू आजाराला प्रतिबंध घालण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय हे खरे आहे.

१ जानेवारी ते १४ मे २०१९ या कालावधीत राज्यात स्वाईन फ्ल्यूचे १५३६ रुग्ण आढळले असून १५६ रुग्णांचा या आजाराने मृत्यू झाला आहे. मार्च व एप्रिल २०१९ या दोन महिन्यांच्या कालावधीत स्वाईन फ्ल्यूचे ९०८ रुग्ण आढळून आले असून या दोन महिन्यात ९८ रुग्णांचा मृत्यू झाल आहे.

(२) हे अंशत: खरे आहे

१ जानेवारी ते १४ मे २०१९ या कालावधीत नाशिकमध्ये ३४, नागपूर व पुण्यात २१, तर कोल्हापूर मध्ये ९, मुंबईमध्ये ५ आणि अहमदनगर जिल्हयात १४ मृत्यू झाले आहेत.

(३) हे खरे नाही.

सन २०१८ मध्ये फ्ल्यू विरोधी लस १,२८,०२६ व्यक्तींना देण्यात आली होती या लसीमुळे मिळणारी प्रतिकार शक्ती ८-१२ महिने टिकते.

(४) स्वाईन फ्ल्यूच्या प्रभावी प्रतिबंध व नियंत्रणासाठी पुढील उपाययोजना राबविण्यात येतात -

१) फ्ल्यू रुग्णांचे नियमित सर्वेक्षण
२) फ्ल्यू रुग्ण उपचारासाठी सर्व सार्वजनिक आरोग्य रुग्णालयात तसेच खाजगी रुग्णालयात उपचार सुविधा
३) फ्ल्यू निदानाची सोय
४) फ्ल्यू वरील प्रभावी औषध ऑसेलटॅमी वरची पुरेशी उपलब्धता
५) गंभीर रुग्णांसाठी व्हेंटीलेटर उपचार सुविधा
६) अतिजोखमीच्या व्यक्तीना मोफत फ्ल्यू लसीकरण
७) सरकारी व खाजगी डॉक्टरांचे प्रशिक्षण
८) स्वाईन फ्ल्यू प्रतिबंधासाठी जनतेचे विविध माध्यमातून प्रबोधन

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चिपळूण व संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील मुंबई-गोवा महामार्गालगतच्या गावांसाठी बायपास, भुयारीमार्ग, बॉक्स मोरी व सर्व्हिस रोड बांधण्याबाबत

**(५६) * १४०४१७ श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामामुळे व भविष्यातील वाढत्या वेगवान वाहतुकीमुळे सुरक्षिततेच्या दृष्टीने महामार्गाच्या दोन्ही बाजूच्या असुर्डे, आगवे, कोंडमळा, खेरशेत इत्यादी (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) व आरवली (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) या गावांमध्ये बायपास, भुयारीमार्ग, बॉक्स मोरी व दोन्ही बाजूने सर्व्हिस रोड होणेबाबत स्थानिक ग्रामस्थ व संबधित ग्रामपंचायतीकडून वारंवार मागणी केली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींनीही याबाबत मुख्य अभियंता, राष्ट्रीय महामार्ग, महाराष्ट्र, जिल्हाधिकारी, रत्नागिरी व संबधीत कार्यालयांकडे पत्रव्यवहार करून उपरोक्त गावांच्या ठिकाणी शाळा व हायस्कूल तसेच बाजारपेठ, शेती, पाण्याचे स्त्रोत, रेशन दुकाने, बस थांबे आदी नेहमीच्या वापराची ठिकाणे असल्यामुळे याबाबत मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामस्थांच्या व लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार उक्त गावांसाठी बायपास, भुयारीमार्ग, बॉक्स मोरी व दोन्ही बाजूने सर्व्हिस रोड बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय.

(२) होय.

(३) राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ च्या चौपदरीकरणाच्या मंजूर आराखडयामध्ये कोणतेही बदल न करण्याचे केंद्र शासनाचे निर्देश आहेत.तथापि ग्रामस्थ व लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार १.वालोपे २.कोंडमळा ३. आगवे. ४. खेरशेत याठिकाणी पादचारी भुयारी मार्गाचा प्रस्ताव केंद्र शासनास मंजुरीसाठी सादर करण्याबाबत कार्यवाही प्रगतीत आहे. त्यानंतर केंद्र शासनाकडून प्राप्त होणा-या मंजुरीनंतर/आदेशानुसार सदरबाबत पुढील कार्यवाही हाती घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कळमखार (ता.धारणी, जि.अमरावती) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील कनिष्ठ सहायकाने केलेल्या गैरव्यवहार

**(५७) * १३७६३० प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमखार (ता.धारणी, जि.अमरावती) प्राथमिक आरोग्य केंद्रातील श्री.विक्रांत लादे, कनिष्ठ सहायकाने कर्मचा-यांच्या ऑनलाईन वेतन देयक वैदयकीय अधिका-यांचे लॉगिन आईडी पासवर्डचा गैरवापर करुन सुमारे १७ लाख, ४७ हजार, ३५३ रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या चौकशी अहवालावरुन स्पष्ट झाले असल्याचे दिनांक ५ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार कळमखार प्राथमिक आरोग्य केंद्रातील कनिष्ठ सहायकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) होय.

(३) कनिष्ठ सहायक यांचे विरुध्द पोलीस स्टेशन धारणी येथे कलम ४०९ अन्वये दिनांक ४.४.२०१९ फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांना दि. ८.१.२०१९ रोजी निलंबीत केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मंगळूरपीर- अकोला या राष्ट्रीय महामार्गाच्या कामासाठी निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरण्यात येत असल्याबाबत

**(५८) * १४१२९२ श्री.अमित झनक (रिसोड), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हयामधुन जाणारा मंगरुळपीर-अकोला हा राज्य महामार्ग राष्ट्रीय महामार्ग म्हणुन दर्जोन्नत झाला असून या राष्ट्रीय महामार्गाच्या सुधारणेसाठी १३२ कोटी रुपये खर्च करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामार्गाचे रुंदीकरण व मजबुतीकरणाच्या कामासाठी संबंधित विभाग नाकारलेला मुरुम, टोळ गोटयाचा वापर करीत असुन महामार्गावर पार्डीताड फाटयाजवळ कोणतेही खोदकाम न करता केवळ काळया मातीवर मुरुम टाकून दबाई करून गैरव्यवहार करीत असल्याचे दिनांक २२ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार या रस्त्यासाठी निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरणाऱ्या कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सदर महामार्गाच्या पार्डीताड फाटयाजवळ अस्तित्वातील भूपातळी मध्ये ६० सें.मी. उंचीचे खोदकाम करुन काळी माती काढून टाकण्यात आली आहे. तसेच सदर कामाकरिता आणलेल्या मुरुमामधील विहित विनिर्देशातील आकारमानापेक्षा मोठे आढळलेले गोटे दबाई पूर्वी काढून टाकून त्यानंतरच रस्ता भरावाची पाणी टाकून दबाई करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जत (जि.सांगली) येथील तहसील व प्रांताधिकारी कार्यालयात बनावट पावत्यांच्या (चालान) आधारे केलेला गैरव्यवहार

**(५९) * १३५१९३ अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जत (जि.सांगली) येथील तहसील व प्रांताधिकारी कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी अवैध वाळू वाहतुकीच्या दंडाच्या बनावट पावत्या दाखवून २२ लाख ५० हजार रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेकायदेशीरपणे वाळू आणि अन्य गौण खनिजांची वाहतूक करणाऱ्यांची वाहने जप्त करून बनावट चलनाच्या आधारे त्यांच्याकडून रक्कम जमा करून सदर गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करून उक्त कार्यालयातील संबंधित दोषी कर्मचारी व इतर संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) जत, जि.सांगली येथील उपविभागीय अधिकारी कार्यालय व तहसिलदार कार्यालय येथील कर्मचाऱ्यांचा अवैध वाळू वाहतूकीच्या दंडाच्या रुपये २७.४० लक्ष इतक्या रक्कमेच्या बनावट चलनांच्या गैरव्यवहार प्रकरणी सहभाग असल्याचे प्रथम दर्शनी निदर्शनास आले आहे.

या प्रकरणी उपविभागीय अधिकारी, जत व तहसिलदार कार्यालय, जत यांचे कार्यालयातील प्रथम दर्शनी दोषी आढळून आलेल्या ८ कर्मचाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित असून त्यापैकी २ कर्मचाऱ्यांना दि.१०/६/२०१९ रोजी निलंबित करण्यात आले आहे. तसेच संबंधित वाहनधारकांविरुध्द जत पोलीस ठाणे व उमदी पोलीस ठाणे (जि.सांगली) येथे गुन्हे दाखल करण्यात आले असून प्रकरण पोलीस तपासावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आटपाडी (जि.सांगली) तालुक्यातील रब्बी हंगामातील पिके व डाळिंब या फळ पिकांसाठी पिक विमा मंजूर करण्याबाबत

**(६०) * १३८०५९ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आटपाडी (जि.सांगली) तालुक्यातील खरिपाच्या २६ गावांसाठी खरीप पिके आणि बहुवार्षिक पिकांसाठी पीक विमा जाहिर करण्यात आला असुन रब्बीच्या ३४ गावांतील रब्बी पिके आणि डाळिंबासाठी विमा जाहीर करण्यात आला नसल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रब्बीच्या ३४ गावांतील रब्बी पिके आणि डाळिंबासाठी विमा जाहीर करण्यास विलंब होत असल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार आटपाडी तालुक्यातील रब्बीच्या ३४ गावांतील रब्बी पिके आणि डाळिंबासाठी विमा जाहीर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अनिल बोंडे :** (१) हे खरे नाही.

प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत रब्बी हंगाम २०१८-१९ मधील विमा नुकसान भरपाई अद्याप निश्चित करण्यात आलेली नाही. तसेच पुनर्रचित हवामानावर आधारीत फळपीक विमा योजना आंबीया बहार २०१८-१९ ची नुकसान भरपाई निश्चित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सायन-पनवेल महामार्गावर तुर्भे ते खारघर दरम्यान सहा किमी लांबीचा बोगदा बांधून आठपदरी रस्ता तयार करण्याबाबत

**(६१) * १३६१३९ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील अंतर्गत वाहतुकीमुळे शीव-पनवेल महामार्गावर होणारी वाहतुकीची कोंडी दूर करण्यासाठी तुर्भे ते खारघर दरम्यान सहा किमी लांबीचा बोगदा बांधून आठपदरी रस्ता तयार करण्याचा प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश मा. मुख्यमंत्री यांनी पायाभुत सुविधा समितीच्या बैठकीत दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.मुख्यमंत्री यांच्या निर्देशानुसार प्रस्ताव तयार करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने शीव-पनवेल महामार्गावर तुर्भे ते खारघर दरम्यान सहा किमी लांबीचा बोगदा बांधून आठपदरी रस्ता तयार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

दिनांक २९.०८.२०१८ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीतील निर्देशानुसार दिनांक ०१.१०.२०१८ रोजीच्या शासन निर्णया व्दारे सायन पनवेल या रस्त्यावरील वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी पर्याय म्हणून तुर्भे ते खारघर बोगद्याच्या प्रकल्पाबाबत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी सुसाध्यता तपासावी. सिडको आणि एम.आय.डी.सी. यांनी या प्रकल्पात महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्यासोबत सहभागी होऊन या प्रकल्पासाठी लागणाऱ्या जमिनीच्या उपलब्धतेबाबत व प्रकल्पासाठी लागणाऱ्या भाग वित्तीय सहाय्य करावे. असे निर्देश दिले आहेत. त्यास अनुसरुन सद्या सदर बोगदा व जोड रस्त्याच्या प्रकल्पाची पूर्व सुसाध्यता (Prefeasibility) तपासण्याचे काम प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद् भवत नाही.

-----------------

## सुकापूर-नेरे (ता.पनवेल, जि.रायगड) या रस्त्यावरील अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत

**(६२) * १३५०६१ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुकापूर-नेरे (ता.पनवेल, जि.रायगड) या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील रस्त्याच्या दोन्ही बाजूंना अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे गॅरेज, फेरीवाले, खाद्य पदार्थांची दुकाने, हातगाडया, फर्नीचरची दुकाने यांनी मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केले असुन त्यामुळे दररोज वाहतूक कोंडी होऊन नागरिकांची गैरसोय होत असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार सुकापूर-नेरे या रस्त्यावरील अतिक्रमण निष्कासित करून याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिका-यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

पनवेल नेरे मालडुंगे या राज्यमार्ग क्र. १०३ चा सुकापूर-नेरे हा भाग असून या रस्त्यावर प्रामुख्याने आदई सर्कल ते चिपळे फाटा या लांबीमध्ये अतिक्रमणे आहेत.
(२), (३) व (४) सदर अतिक्रमणे हटविण्यासाठी अतिक्रमण धारकांना दि. १८.०१.२०१७ रोजी अनाधिकृत केलेले बांधकाम काढण्याबाबत क्षेत्रीय कार्यालयाने अतिक्रमण धारकांना नोटीस बजावून अतिक्रमणे अंशत: काढण्यात आली आहेत. उर्वरीत लांबीतील अतिक्रमणे पोलिस संरक्षणात काढण्याचे नियोजन आहे.

-----------------

## पालघर व डहाणू (जि.पालघर) तालुक्यात बनावट औषधे शेतकऱ्यांना विकण्यात येत असल्याबाबत

**(६३) * १३९०२२ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर व डहाणू (जि.पालघर) तालुक्यात बागायती शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना खते व औषधे विक्रेते हे जैविक औषधांच्या नावाखाली बोगस औषधे विकत असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने बोगस औषध विक्रेत्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अनिल बोंडे :** (१) नाही.

(२) व (३) कृषि निविष्ठांचे विक्री संबंधी दिनांक १३/०४/२०१९ रोजीच्या दैनिक पुण्यनगरी मध्ये बोगस जैविक खते व औषधांच्या नावाखाली शेतकऱ्यांची फसवणूक अशा आशयाचे वृत्त प्रसिध्द झाले. त्याअनुषंगाने ७ गुणनियंत्रण निरिक्षकांमार्फत पालघर व डहाणू तालुक्यातील १३ कृषि सेवा केंद्राची तपासणी करण्यात आली. तथापि, वृत्तपत्रातील बातमीच्या अनुषंगाने तपासणीत या कृषि निविष्ठा विक्री केंद्रात बोगस विक्री संबंधातील कुठलीही बाब निदर्शनास आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाणगांव पाटेपाडा ते वाणगांव (ता.डहाणू, जि.पालघर) या रस्त्याच्या बांधकामाबाबत

**(६४) * १३७७५४ श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाणगांव (ता.डहाणू, जि.पालघर) येथील ग्रामपंचायत हददीतील वाणगांव पाटेपाडा ते वाणगांव या बायपास रस्त्याची कामे ही नियमबाहय सीआरझेड प्रतिबंधित क्षेत्रात करून ठेकेदाराने केंद्र शासनाच्या डहाणू नोटिफिकेशन १९९१ मधील तरतुदींचा आणि जमिन महसूल कायदयातील तरतुदींचा भंग केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्ता बांधण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार, यांनी रुपये २१,२८,६७२/- रकमेची निविदा मंजूर केली होती परंतु नियोजित ठिकाणी रस्ता न बांधता अन्यत्र बांधून निधीचा गैरवापर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार नियोजित ठिकाणी रस्ता न बांधता अन्यत्र रस्ता बांधणाऱ्या संबंधित ठेकेदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्नांकित पाटेपाडा ते वाणगांव रस्त्यावर कि.मी. ०/०० ते ०/४५० मध्ये अस्तित्वातील कच्च्या रस्त्याच्या भरावाची उंची वाढवून खडीकरण केलेले असून मंजूर ठिकाणीच काम करण्यात आलेले आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महिपाळगड (जि.कोल्हापूर) या गावाची महसुली अभिलेखात नोंद घेण्याबाबत

**(६५) * १३७१०० श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील महिपाळगड किल्ल्यावर १५०० नागरिक राहत असतानाही या गावाची शासनाकडे नोंद नसल्यामुळे सदर गाव शासनाच्या सर्व योजनांपासून वंचित राहत असल्याचे माहे जून, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुमारे २०० हेक्टर परिसरात महिपाळगड गाव विस्तारलेले असून या गावाचा सिटीसर्व्हे नकाशा किंवा गावठाण वस्तीचा सातबारा तसेच शेतीचा सातबारा याची नोंद नसल्यामुळे तेथील नागरीकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या गावातील शेतकऱ्यांचा सातबारा व सिटी सर्व्हे नकाशा तयार करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.महसूल मंत्री तथा पालकमंत्री, कोल्हापूर यांच्याकडे दिनांक ३ नोव्हेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या मागणीच्या अनुषंगाने उक्त गावातील शेतकऱ्यांचा सातबारा व सिटी सर्व्हे नकाशा तयार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) कोल्हापूर जिल्हयातील महिपाळगड हे गाव मूळ चंदगड तालुक्यातील सुंडी या गावापैकी असून दि. ०१/०७/१९७६ च्या शासन अधिसूचनेव्दारे तसेच जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्या दि. १७/०७/१९७८ च्या आदेशान्वये स्वतंत्र महसूली गांव म्हणून अस्तित्वात आलेले आहे,

(२) मौजे महिपाळगड जुना स. नं. १/१ ला नविन ग. नं. २ असून क्षेत्र १३६ हे. ९८ आर असून गा. न. नं. ७/१२ या अधिकार अभिलेखात धारक सदरी "महाराष्ट्र शासन वने" अशी नोंद असून सदर क्षेत्रातच महिपाळगड किल्ला व नागरी वस्ती येते. गा. न. नं. ७/१२ या अधिकार अभिलेखात धारक सदरी "महाराष्ट्र शासन वने" अशी नोंद असल्यामुळे नगर भूमापनाची कार्यावही करता आलेली नाही.

(३) व (४) होय.

या संदर्भातील स्थानिक लोकप्रतिनिधींचे दि. २९/११/२०१८ चे निवेदन प्राप्त झाले आहे.

उक्त गावातील रहिवाशांसाठी अधिकार अभिलेख तयार करण्याकामी वन विभागाशी विचार विनिमय करून उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात महिलांची घरी प्रसूती होण्याचे प्रमाण वाढल्याबाबत

**(६६) * १३७६२२ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.प्रकाश फातर्पेकर**

**(चेंबूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिनांक १ एप्रिल, २०१८ ते २० फेब्रुवारी, २०१९ या कालावधीत सुमारे ११ हजार ९५० महिलांची प्रसूती घरीच झाल्याची बाब आरोग्य विभागाच्या माहे एप्रिल, २०१९ च्या पहिल्या आठवड्यात जाहीर केलेल्या नोंदीवरुन निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईसह राज्यातील २६ महापालिकांमध्येही एकूण २२२३ महिलांची प्रसूती घरीच झाली असल्याची नोंद असुन नंदुरबार, अमरावती व गडचिरोली या जिल्हयात महिलांची घरी प्रसूती होण्याची आकडेवारी जास्त व लक्षणीय आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य व केंद्र शासनाकडून विविध योजनांद्वारे कोट्यावधी रुपये खर्च करण्यात येत असतानाही रुग्णालयाऐवजी घरीच प्रसूती होण्याच्या प्रमाणात वाढ होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबतचा आढावा घेवून महिलांची प्रसूती रुग्णालयातच व्हावी याद्दष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) राज्य व केंद्र शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपाययोजनांमुळे मागील ३ वर्षात घरी झालेल्या प्रसुतीच्या संख्येत लक्षणीय घट झालेली आहे.

i. राज्यात होणाऱ्या एकुण प्रसुतींपैकी ९९ टक्के प्रसूती हया संस्थात्मक प्रसूती तर १% प्रसुती हया घरी होणाऱ्या प्रसूती आहेत.

ii. राज्यातील अतिदुर्गम आदिवासी बहुल जिल्हयांमध्ये घरी होणाऱ्या प्रसूतीचे प्रमाण जास्त आहे. त्याची कारणे खालील प्रमाणे -

• आदिवासींच्या रुढी आणि परंपरा

• दळणवळणाची सोय कमी प्रमाणात उपलब्ध आहे.

• मोबाईल कनेक्टीवीटी कमी असल्याने लाभार्थींना आरोग्य संस्थेशी संपर्क करण्यास अडचणी निर्माण होतात.

(४) राज्यात होणाऱ्या एकुण प्रसुतींपैकी घरी होणाऱ्या प्रसुतीचे प्रमाण अत्यल्प आहे. सदर प्रसुती संस्थेत करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

सर्व गरोदर मातांचे अपेक्षित प्रसूतीचा दिनांक व अपेक्षित प्रसूतीचे ठिकाण याचे संनियंत्रण करण्यात येते.

i. जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम अंतर्गत मोफत वाहतुक सेवेअंतर्गत लाभार्थींना १०२ व १०८ क्रमांकावर फोन करण्याची सुविधा उपलब्ध केली आहे. या सुविधेनुसार फोन केल्यास लाभार्थीस वाहनाची सोय उपलब्ध होते.

ii. गरोदर मातेची प्रसूतीपुर्व, प्रसूतीदरम्यान व प्रसूती पश्चात ६ आठवडयापर्यंत मोफत तपासणी केली जाते. तसेच एका वर्षापर्यंतच्या आजारी बालकाचेदेखील मोफत निदान केले जाते.

iii. घरी बाळंतपण होणाऱ्या मातेला संस्थेमध्ये प्रसूती करण्यास प्रोत्साहीत केल्यास प्रति लाभार्थी रु.४००/- याप्रमाणे प्रोत्साहनात्मक भत्ता दाईस दिला जातो.

iv. जननी सुरक्षा योजने अंतर्गत अनुसूचित जाती अनुसूचित जमाती व दारिद्रय रेषेखालील प्रवर्गातील गर्भवती लाभार्थींना शासकीय अथवा शासन मान्य संस्थेत प्रसूती झाल्यास आर्थिक लाभ देण्यात येतो.

v. आदिवासी पाडयांमध्ये डोंगराळ भाग असून अवघड रस्ते असल्याने गर्भवती महिलांना प्रसुतीसाठी आरोग्य संस्थेत पोहोचणे अडचणीचे होवू नये म्हणून ९ आदिवासी जिल्हयांमध्ये "माहेरघर" योजनेद्वारे सर्वकष सेवा उपलब्ध केली आहे. या सेवेनुसार गर्भवती महिलेस प्रसूतीपूर्व ४ ते ५ दिवस अगोदर या माहेरघर मध्ये राहता येते. जेणे करुन आरोग्य संस्थेत तात्काळ पोचणे सुलभ होते.

vi संपर्क तुटणा या गावांसाठी बेली ब्रिजेस व फूट ओव्हर ब्रिजेस ची बांधणी करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

# पुणे-सातारा राष्ट्रीय महामार्गाच्या सहापदरीकरणाच्या कामातील नसरापूर व चेलाडी भागातील भिंतीचे काम निकृष्ट दर्जाचे सुरु असल्याबाबत

**(६७) * १३६७०१ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-सातारा राष्ट्रीय महामार्गाच्या सहापदरीकरणाच्या कामातील नसरापूर व चेलाडी भागातील रस्त्यावरील भिंतीचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नसरापूर येथील चेलाडी फाट्यावर गत सहा महिन्यांपासून उड्डाणपुलाचे बांधकाम सुरु असून या कामामध्ये पुणे-सातारा बाजूच्या महामार्गावरील पुलाची भिंत निकृष्ट दर्जाची बांधल्याने भिंत कुमकुवत झाली असून अनेक ठिकाणी तडे गेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरच्या भिंती लगत दोन्ही बाजूने राष्ट्रीय महामार्गावरील अवजड वाहनांची संख्या मोठी असल्याने भविष्यात मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता निर्माण झाली असून संबंधितांकडून याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करून सदर भिंतीचे काम गुणवत्तापूर्ण करुन निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

सदर काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात आले असून त्यांनी प्रस्तुत बाब खरी नसल्याचे कळविले आहे.

(२) हे खरे नसून नसरापूर येथील चेलाडी फाटयावरील उड्डाणपूलाच्या ॲप्रोचच्या भिंतीचे काम विहित विनिर्देशानुसार करण्यात येत आहे. तसेच सदर भिंतीला तडे गेल्याचे पाहणीअंती दिसून आलेले नाही, असे प्रकल्प संचालक,भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

(३) हे खरे नाही.

सदर ठिकाणी बांधण्यात आलेल्या भिंतीमुळे (RE Wall) भविष्यात मोठी दुर्घटना/अपघात घडण्याची शक्यता नसल्याचे प्रकल्प संचालक,भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,पुणे यांनी कळविले आहे.

(४) सदर काम विहित विनिर्देशानुसार करण्यात येत असल्याने कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही, असे प्रकल्प संचालक,भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,पुणे यांनी कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बुलढाणा तालुक्यात शंभर खाटांचे महिला व बाल रुग्णालय सुरु करण्यासह मोताळा तालुक्यातील ५० खाटांच्या रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्याबाबत

**(६८) * १३५६४४ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा तालुक्यातील १०० खाटांचे महिला व बाल रुग्णालय इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून कर्मचारी आकृतीबंध सुद्धा मंजूर झाला असुनही सदर रुग्णालय सुरु झाले नसल्याचे दिनांक ३१ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मोताळा (जि.बुलढाणा) तालुक्यात ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय कार्यान्वित असून सदर रुग्णालय ५० खाटांच्या रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्याबाबतचा प्रस्ताव आरोग्य संस्थांच्या बृहत आराखड्यात सुधारित करताना विचारात घेण्याबाबत शासन विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, बुलढाणा तालुक्यातील शंभर खाटांचे महिला व बाल रुग्णालय सुरु करण्यासह मोताळा तालुक्यात ५० खाटांच्या रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) बुलढाणा येथील १०० खाटांच्या महिला व बाल रुग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून विदयुतीकरण व पाणीपुरवठा पाईपलाईनचे काम अंतिम टप्प्यात आहे. याबाबत बांधकाम विभागाकडे पाठपुरावा सुरु आहे.

सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारीत बृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही संचालनालयस्तरावर सुरु असून ग्रामीण रुग्णालय, मोताळा चे ५० खाटाच्या उपजिल्हा रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्याबाबत निकषानुसार जोड बृहत आराखडयामध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अंधेरी (मुंबई) येथील सर्वे नं. १०५, न.भू.क्र.२११ पै.एस.एस.१० या जागेचा झालेला गैरव्यवहार

**(६९) * १३८३७७ श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंधेरी (मुंबई) येथील सर्वे नं. १०५, न.भू.क्र.२११ पै.एस.एस.१० गिल्बर्ट हिल या जागेतील बॉम्बे कन्स्ट्रक्शन कार्पोरेशन कंपनीस भाडेपट्टयाने मंजूर केलेल्या ७६५०० चौ.वार जमिनीबाबत झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याबाबतचे निवेदन अध्यक्ष, लाईफ ॲण्ड लाईट संस्था यांनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक २६ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू जमिनीचा भाडे करार (लिज) संपुष्टात आल्यानंतर मुदतवाढ देण्याबाबतची विनंती जिल्हाधिकारी यांनी फेटाळल्यानंतर सदर जमीन शासनाने ताब्यात घेण्याऐवजी तहसिलदार यांनी उक्त जमिनीस कुंपण घालण्याची परवानगी संबंधितास दिली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जमीन ज्या मुळ मालकाने भाडेपट्टयावर घेतली त्यांच्याशी कोणताही संबंध नसताना अल्पेश अजमेरा यांनी त्याच नावाची कंपनी तयार करुन व अधिकाऱ्यांशी संगनमत करुन कोणताही पुरावा, वारसदार नसताना जमीन हडप करून शासनाच्या कोट्यवधी रुपयांची फसवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करून सदर जमीन ताब्यात घेण्याबाबत तसेच संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) मौजे अंधेरी, ता.अंधेरी, जि.मुंबई उपनगर येथील सर्वे नं. १०५अ, न.भू.क्र.२११ पै.,एस.एस.१० गिल्बर्ट हिल क्षेत्र ७६५० चौ.वार. (६३९६.३२ चौ.मी.) या मे. बॉम्बे कन्स्ट्रक्शन कार्पोरेशन कंपनीस प्रदान केलेल्या जमिनीबाबत झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यासंदर्भात मा. मुख्यमंत्री महोदयांना दि. २६/०३/२०१९ रोजी लिहीलेले पत्र मुख्यमंत्री सचिवालयात अथवा या विभागात प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही. तथापि, या संदर्भात मा. मुख्यमंत्री महोदयांना उद्देशुन यापूर्वी लाईफ इन लाईट या संस्थेने लिहिलेले पत्र जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांना दि. १४/०८/२०१७ रोजी प्राप्त झाले होते.

मौजे अंधेरी येथील उक्त नमूद जमीन मे. बॉम्बे कन्स्ट्रक्शन कार्पोरेशन कंपनीस दि. ०१/०८/१९४३ पासून १७ वर्षाच्या कालावधीसाठी क्रशर उभारणे, खाणीतून काढलेल्या गौण खनिजाचा साठा करणे व कामगारांसाठी झोपड्या बांधणे इत्यादी प्रयोजनासाठी ठराविक अटी व शर्तीवर भाडेपट्टयाने देण्यात आली होती. सदर भाडेपट्ट्याची मुदत दि. ३१/०७/१९६० साली संपुष्टात आली असून, ही मुदत पुढे १५ वर्षांनी वाढवून मिळण्याबाबत संस्थेने विनंती केली होती. तसेच, सदर कंपनीने जमिनीचे अतिक्रमणपासून संरक्षण व्हावे म्हणून जमिनीसभोवार आवार भिंत बांधण्याकरीता त्यांच्या दि. २९/०३/१९९६ च्या पत्रान्वये परवानगी मागितली. त्यानुसार, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दि. ०३/०४/१९९६ रोजीच्या पत्रान्वये तात्पुरते तारेचे कुंपण घालण्यास परवानगी दिली होती. तसेच सदर परवानगीव्दारे कंपनीस कोणत्याही प्रकारचा हक्क प्राप्त होणार नाही असे देखील स्पष्ट करण्यात आले होते.

(३) व (४) श्री अल्पेश अजमेरा यांच्या अर्जावरून मे. बॉम्बे कन्स्ट्रक्शन कार्पोरिशन कंपनीच्या नावे उक्त भाडेपट्टयाचे नुतनीकरण दि. ३१/१२/२०२८ पर्यंत तत्का. जिल्हाधिकारी यांनी दि. २७/०७/२००४ च्या आदेशान्वये केले आहे. सदर आदेशास तत्कालीन मा. मंत्री (महसूल) यांनी दि. ३१/०७/२००७ रोजीच्या अर्धन्यायीक आदेशान्वये मान्यता दिलेली आहे. तद्नंतर जिल्हाधिकारी यांच्या दि.२७/०४/२०१२ रोजीच्या आदेशान्वये अनर्जित उत्पन्नाची रक्कम वसूल करून मे. दर्शन डेव्हलपर्स प्रा. लि. यांचेकडे सदर भाडेपट्टयाचे हस्तांतरण करण्यास मान्यता देण्यात आली आहे. प्रश्नाधीन जमिनीवर मे. दर्शन डेव्हलपर्स प्रा. लि. करीत असलेल्या बांधकामास जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दि. १६/०१/२०१५ रोजीच्या आदेशान्वये स्थगिती दिली होती. त्यावर मे. दर्शन डेव्हलपर्स प्रा. लि. यांनी दाखल केलेल्या पुनरिक्षण अर्जावर मा. राज्यमंत्री (महसूल) यांनी सुनावणीअंती दि. २८/०९/२०१६ रोजी आदेश पारित करून पुनरीक्षण अर्ज मंजूर केला. या आदेशाविरोधात मा.उच्च न्यायालयात दाखल याचिकेमध्ये मा.उच्च न्यायालयाने दि. २४/०४/२०१७ रोजीच्या आदेशान्वये निर्देशित केल्याप्रमाणे मा.मंत्री (महसूल) यांनी पुनर्विलोकन प्रकरणी सुनावणी घेऊन दि.३१/०१/२०१९ रोजी आदेश पारित केले असून मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे दिनांक २८/०९/२०१६ चे आदेश रद्द केले आहेत. तसेच,सदर आदेशान्वये प्रश्नाधिन जमिनीच्या भाडेपट्टा नुतनिकरणाच्या आदेशाबाबत जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी चाचणी न्यायालय या नात्याने हितसंबंधीतांना नैसर्गीक न्याय तत्वानुसार संधी देऊन भाडेपट्याबाबत पुरावे प्राप्त करून घेऊन उचित आदेश पारित करावेत असे आदेशित केले आहे. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्हयात रुग्णालयांनी महात्मा फुले जनआरोग्य योजनेत केलेला गैरप्रकार

**(७०) * १४१३३३ श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील रुग्णालयांनी गरीब रुग्णांकरिता असलेल्या महात्मा फुले जनआरोग्य योजनेचा गैरफायदा घेवुन रुग्णांकडून जादा रक्कम वसूल करणे, उपचार देण्यास नकार देणे, प्रत्यक्ष खर्चापेक्षा जास्त बिले दर्शवून अनुदान घेणे अशा अनेक तक्रारी आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हयातील रुग्णालयांची तपासणी शासनाकडून करण्यात आली आहे काय व त्यानुसार तपासणीत दोषी आढळून आलेल्या रुग्णालयांची नावे काय आहेत,
(३) असल्यास, दोषी आढळून आलेल्या रुग्णालयांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत कोल्हापुर जिल्हयामध्ये एकुण ११२६ तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. त्यापैकी ९५५ तक्रारींचे निराकरण करण्यात आले आहेत. एकुण १७१ तक्रारी प्रलंबित आहेत.

सदर तक्रारींपैकी रुग्णांकडुन जादा रक्कम वसुल करण्याबाबतच्या १०७५ तक्रारीपैकी ९२० तक्रारींचे निराकरण करण्यात आले असून १५५ तक्रारी प्रलंबित आहेत. उपचारास नकार देण्याबाबतच्या ३३ तक्रारी पैकी १८ तक्रारीचे निराकरण करण्यात आले असून १५ तक्रारी प्रलंबित आहेत.
(२) प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने जिल्हयातील रुग्णालयांची तपासणी शासनाकडुन करण्यात आली असून आतापर्यंत १५ रुग्णालये निलंबित तर १६ रुग्णालयांचे अंगिकरण रद्द करण्यात आले आहे.
(३) महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत योजनेचा लाभ न देणाऱ्या अंगीकृत रुग्णालयावर निलंबाची किंवा अंगीकरण रद्द करण्याची कारवाई करण्यात येत आहे. तसेच अतिरीक्त पैसे घेतल्याच्या तक्रारीच्या अनुषंगाने रुग्णांना पैसे परत करुन तक्रारीचे निराकरण करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खाजगी रुग्णालयांनी रुग्णांची विना परवानगी 'क्लिनिकल ट्रायल' घेतल्याबाबत

**(७१) * १३६३७० श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परदेशातील मोठ्या खाजगी कंपन्यांनी औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्यातील नियमांचे उल्लंघन करुन राज्यातील विविध खाजगी रुग्णालयांमधील रुग्णांची परवानगी न घेवुन घेतलेल्या 'क्लिनिकल ट्रायल' (औषधांचे परिणाम तपासणी चाचण्या) मध्ये मागील १४ वर्षापासून ते अद्यापपर्यंत सुमारे ५ हजार रुग्णांचा बळी जावुन २० हजारांहून अधिक रुग्णांना विविध शारिरीक समस्यांना समोरे जावे लागत असल्याचे दिनांक २१ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्याचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार किती व कोणत्या कंपन्यांनी रुग्णांवर 'क्लिनिकल ट्रायल' अंतर्गत चाचणी केली असल्याचे निष्पन्न झाले आहे,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने 'क्लिनिकल ट्रायल' अंतर्गत चाचणी करुन मृत पावलेल्या रुग्णांच्या कुटुंबियांना व दुष्परिणामास सामोरे जात असलेल्या रुग्णांना संबंधित कंपन्याकडून नुकसान भरपाई देण्यासह संबंधित दोषी कंपन्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) रुग्णांवर औषधांचे परिणाम तपासणी चाचण्या (क्लिनिकल ट्रायल) वर नियंत्रण व अंमलबजावणी केंद्र शासनाच्या आरोग्य मंत्रालयाच्या केंद्रीय औषध प्रमाण नियंत्रण संघटना मार्फत केले जाते. सबब, ही बाब केंद्र शासनाच्या अखत्यारित आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील कुष्ठरुग्णांच्या पुनर्वसनासाठी सर्वकष योजना तयार करण्याबाबत

**(७२) * १३६३६४ श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.राजु तोडसाम (अर्णी), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्वेक्षणात दोन लाख ७६ हजार ७०७ संशयित कुष्ठरुग्ण असून त्यापैकी दोन लाख ६५ हजार ६४७ जणांची तपासणी करण्यात आली, त्यात प्रत्यक्षात पाच हजार २६८ जणांना कुष्ठरोग झाला असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्वोच्च न्यायालयाने सन २०१८ मध्ये कुष्ठरूग्णांच्या पुनर्वसनासाठी सर्वकश योजना तयार करून अंमलबजावणी करण्यास शासनाला आदेश दिले असतानाही राज्यातील अनेक कुष्ठरूग्णांना शासनाच्या विविध योजनांपासून वंचित रहावे लागत असून कुष्ठरूग्णांच्या पुनर्वसनाचा प्रश्न अद्याप प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार कुष्ठरूग्णांच्या पुनर्वसनासाठी सर्वकष योजना तयार करण्याबाबत व कुष्ठरोगावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशतः खरे आहे.

राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये दि.२४.०९.२०१८ ते दि.०९.१०.२०१८ या कालावधीत कुष्ठरुग्ण शोध मोहिम राबविण्यात आली. यामध्ये ग्रामीण भागातील सर्व लोकसंख्या व शहरी भागातील निवडक लोकसंख्या (३०%) १

पुरुष स्वयंसेवक व १ आशा स्वयंसेवक यांचेकडून सर्व्हे करण्यात आला आहे. या सर्वेक्षणामध्ये ५२६८ नवीन कुष्ठरुग्ण माहे ऑक्टोंबर २०१८ अखेर शोधुन औषधोपचाराखाली आणण्यात आले.

(२) हे खरे नाही.

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या याचिका क्र.११५१/२०१७ दिलेल्या निर्देशानुसार कुष्ठरुग्णांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.

• कुष्ठरोगा विषयी जनजागृती करुन कुष्ठरोग पुर्णपणे बरा होतो व हा आजार कमी प्रमाणात संसर्गजन्य आहे. याची प्रसिध्दी कुष्ठरोग शोध मोहिम, स्पर्श जनजागृती अभियान यासारखे मोहिम घेऊन करण्यात येते.

• मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यासाठी दि.११.११.२०१८ रोजी राज्यातील सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हाशल्यचिकित्सक, मुख्य वैद्यकीय अधिकारी (मनपा), सहाय्यक संचालक (कुष्ठरोग) यांना सविस्तर मार्गदर्शक सुचना देण्यात आल्या आहेत.

• दुरदर्शन, आकाशवाणी, स्थानिक केबल इ वरुन समाजामध्ये कुष्ठरुग्णांविषयी भेदभाव न करण्यासाठी विविध अभियानात संदेश देण्यात येताता.

• कुष्ठरुग्णांच्या निदान व उपचारामध्ये कोणताही भेदभाव करण्यात येत नाही.सर्वसाधारण आरोग्य सेवेकडून सर्व शासकिय व निमशासकिय दवाखान्यामध्ये आवश्यक त्या सर्व सेवा दिल्या जातात.

• स्पर्श जनजागृती कार्यक्रमांतर्गत कुष्ठरोग निवारण दिन (३० जानेवारी) ला ग्रामसभेमध्ये कुष्ठरुग्णांना देण्यात येणा-या शासकिय योजनांची माहिती देण्यात येते.

• विकृती प्रतिबंध व वैद्यकियय पुनवर्सन या कार्यक्रमांतर्गत रुग्णांचे वैद्यकिय, सामाजिक व आर्थिक पुनर्वसन करण्यात येते.

• राज्यामध्ये पुनर्वसन तत्वावर १६ स्वयंसेवी संस्था कार्यरत असून त्यांच्या मार्फत सन २०१८-१९ मध्ये १२१४२ रुग्णांचे पुर्नवसन करण्यात आले आहे.

• या कार्यक्रमांतर्गत कुष्ठरुग्णांना पुरविण्यात आलेल्या विविध सेवाचा अहवाल नियमित शासनास सादर करण्यात आले आहे.

• या कार्यक्रमांतर्गत कुष्ठरुग्णांना पुरविण्यात आलेल्या विविध सेवाचा अहवाल नियमित शासनास सादर करण्यात येतो.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही

(४) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनूसार खालीलप्रमाणे प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येते :-

• कुष्ठरुग्णांचे पुनर्वसन शासन व स्वंयसेवी संस्था यांच्या मार्फत करण्यात येते.

• नविन रुग्णांच्या सहवासितांची तपासणी करण्यात येते. नविन रुग्णांच्या घराभोवतीच्या ३०० घरांचा कुष्ठरोग सर्व्हे केला जातो.

• शालेय आरोग्य तपासणी

• सतत ३ वर्ष शुन्य रुग्ण असलेल्या गाव /वार्ड सर्व्हेक्षण करण्यात येते.

• कुष्ठरोग शोध मोहिम (२४ सप्टेंबर २०१८ ते ९ ऑक्टोबर २०१८) राज्यातील सर्व जिल्हया राबवून यामध्ये ७ कोटी ३६ लाख लोकसंख्येचा सर्वेक्षण करण्यात आला. यामध्ये ५२६८ नविन रुग्ण शोधून उपचाराखाली आणण्यात आले.

• स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान मागील ३ वर्षापासून ३० जानेवारी गांधी जयंती दिनी राज्यातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये विशेष ग्रामसभा घेऊन लवकर कुष्ठरुग्ण शोधणे व कुष्ठरोगविषयक समाजात असलेली घृणा कमी करण्यासाठीची मोहिम स्पर्श या नावाने राबविण्यात येते.

• तसेच विविध आरोग्य शिक्षण कार्यक्रमांतर्गत खाजगी वैद्‌यकीय व्यवसायिक कार्यशाळा, शालेय विद्‌यार्थ्यांची प्रश्नमंजूषा रॅली, आरोग्य शिबीर, अशासकीय संस्था /महिला मंडळ सभा. इ उपक्रम राबविण्यात येतात.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## टाकीपठार (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत

**(७३) * १३६६५५ श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टाकीपठार (ता.शहापूर, जि.ठाणे) येथे बांधण्यात आलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्राचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे करण्यात आले असून कंत्राटदार व शाखा अभियंता यांनी संगनमताने गैरव्यवहार केला असुन त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी सामाजिक संस्थांनी गटविकास अधिकारी, शहापूर यांच्याकडे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीचे बांधकाम पूर्ण न करता काम अर्धवट असतानाच कंत्राटदाराला संपूर्ण देयके अदा करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(४) असल्यास, त्यानुसार प्राथमिक आरोग्य केंद्राचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे करणाऱ्या संबंधित कंत्राटदार व शाखा अभियंत्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात अवकाळी पावसामुळे शेती पिकांचे व फळ बागांचे झालेले नुकसान

**(७४) * १३४८८३ श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.विजय**

**भांबळे (जिंतूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सोलापूर, कोल्हापूर, सांगली, अहमदनगर, जळगांव तसेच मराठवाड्यातील परभणी, हिंगोली, बीड, लातूर, नांदेड व उस्मानाबाद जिल्हयात दिनांक २६ मार्च, २०१९, ४ व ५ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास वादळी वारा व गारपीटांसह झालेल्या अवकाळी पावसामुळे शेती पिकांचे तसेच आंबा, केळी, मोसंबी, द्राक्ष इत्यादी फळ पिकांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, यवतमाळ या जिल्हयातील अनेक ठिकाणी दिनांक २० मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास गारपीटीसह झालेल्या अवकाळी पावसामुळे गहू, हरभरा, वाटाणा, लाखोळी, आब्यांच्या कैऱ्या, संत्रा यासह अनेक पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वादळी वारा व गारपीटीसह झालेल्या अवकाळी पावसात मराठवाड्यात वीज पडून ५ व्यक्तींचा, विदर्भात १० व्यक्तींचा व नाशिकमध्ये ४ व्यक्तींचा मृत्यू झाला असून शेतकऱ्यांची हजारो पशुधन दगावली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यात अवकाळी पाऊसामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी शासनाने केली आहे काय,
(५) असल्यास, त्यानुसार मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींच्या कुटुबियांना आर्थिक मदत देण्यासह शेतपिकांचे, फळबागांचे व पशुधन दगावलेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने काणेती कार्यवाही केली वा करण्या येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) व (२) अंशत: हे खरे आहे.
(३) अंशत: खरे आहे. मराठवाड्यात ५, विदर्भात ७ व नाशिकमध्ये ४ व्यक्तींचा वीज पडून मृत्यू झाला असून, त्यांच्या वारसांना प्रत्येकी रु. ४ लक्ष इतकी मदत देण्यात आली आहे.
(४) व (५) दिनांक २३ एप्रिल, २०१९ च्या शासन पत्रान्वये माहे एप्रिल, २०१९ मध्ये गारपीटीमुळे शेतीपिकांच्या व फळपिकांच्या झालेल्या नुकसानीचे संयुक्त पंचनामे करुन बाधित शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी सविस्तर प्रस्ताव सादर करण्याचे आदेश क्षेत्रिया कार्यालयांना दिले आहेत.

तसेच, पशुधन व वित्तहानीबाबत पात्र बाधितांना मदत देण्याची कार्यवाही क्षेत्रियस्तरावर सुरु आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात नवजात बालकांच्या मृत्युत झालेली वाढ

**(७५) * १३४९८२ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी),**

**ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.नारायण पाटील (करमाळा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.राहूल आहेर (चांदवड), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय आरोग्य विभागाच्या माहितीनुसार पाणी, स्वच्छता, पोषणमुल्य व प्राथमिक आरोग्य सुविधा व तज्ञ डॉक्टरांच्या अभावामुळे सन २०१८-१९ मध्ये राज्यात सुमारे १६३३६ अर्भकांचा मृत्यू झाला असल्याची माहिती दिनांक ७ मे २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील शासकीय रुग्णालयात अपुऱ्या सुविधा व तज्ञ डॉक्टर उपलब्ध नसल्यामुळे सन २०१६-१७ मध्ये १४०३६ तर सन २०१७-१८ मध्ये १७ हजार २६५ नवजात अर्भकांचा मृत्यू झाला असून सुमारे ७८४३२ बालकांची प्रकृती चिंताजनक अवस्थेत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई शहर व उपनगरात १७६३ नवजात बालकांचा मृत्यु झाला असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये निदर्शनास आले असुन पुणे शहरात सन २०१७-१८ मध्ये १४०० व सन २०१८-१९ मध्ये १२८६ इतकी मृत बालके जन्माला आल्याचे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आकडेवाडीनुसार निदर्शनास आले, तसेच रायगड जिल्ह्यात मागिल तीन वर्षात ९६७ बालकांचा मृत्यू झाला असून, इन्क्युबेटर, व्हेंटीलेटरासह वैद्यकीय सुविधा व तज्ञ डॉक्टर नसल्यामुळे माहे एप्रिल ते ऑगस्ट, २०१७ या कालावधीत नाशिक जिल्हा शासकीय रुग्णालयात २२७, ठाणे येथील सिव्हील रुग्णालयात ४७ व सोलापूरमध्ये ८१२ नवजात अर्भकांचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राष्ट्रीय आरोग्य अभियान मोहिमेंतर्गत राज्यातील अर्भकमृत्यू दर १० पर्यंत खाली आणण्याचे उद्दिष्ट राज्य सरकारने निश्चित केलेले असतानाही सदर मृत्यूंचे प्रमाण जास्तच असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(५) असल्यास, राज्यातील नवजात बालकांच्या मृत्यूवर नियंत्रण ठेवण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या व करण्यात येत आहेत,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्याच्या एचएमआयएसच्या अहवालानूसार राज्यामध्ये सन २०१८-१९ मध्ये एकूण १६५३९ अर्भकांचा मृत्यू झाल्याची नोंद आहे. जंतुसंसर्ग, न्युमोनिया, जन्मता कमी वजन व जन्मत: श्वासारोध इ. कारणामुळे हे मृत्यू झाले आहेत.

(२) हे खरे नाही.

राज्याच्या एचएमआयएस च्या अहवालानूसार राज्यामध्ये सन २०१६-१७ व सन २०१७-१८ मध्ये अनुक्रमे एकूण १०३४८ व १३०६९ नवजात अर्भकांचा मृत्यू झाल्याची नोंद आहे.

राज्यामध्ये १८२८ प्राथमिक आरोग्य केंद्रे, १०६६८ उपकेंद्रे, ४६२ आयुर्वेदिक दवाखाने, १०८ प्राथमिक आरोग्य केंद्र, फिरते आरोग्य पथक, २८१ भरारी पथके इ.ठिकाणी कार्यरत वैद्यकीय अधिकारी व विशेषज्ञ यांच्याद्वारे प्राथमिक आरोग्य सुविधा देण्यात येतात.

(३) हे अंशत: खरे आहे.

सदर रुग्णालयांमध्ये वैद्यकीय प्रमाणकानूसार आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानूसार व्हेन्टीलेटरची सुविधा एसएनसीयुमध्ये अपेक्षित नाही. उपरोक्त प्रमाणे झालेले बालमृत्यू इन्क्युबेटर, व्हेंटीलेटरसह वैद्यकीय सुविधा व तज्ञ डॉक्टरांचा अभावामुळे झालेले नसून प्रामुख्याने जंतुसंसर्ग, न्युमोनिया, जन्मत: कमी वजन, जन्मत: श्वसावरोध या कारणामुळे होत असतात. एचएमआयएस अहवालानूसार एप्रिल ते ऑगस्ट २०१७ या कालावधीमध्ये सोलापूर जिल्हयामध्ये एकूण ३०९ नवजात अर्भकांचा मृत्यू झाल्याची नोंद आहे.

(४) हे खरे आहे.

सन २०१३ ते २०३० पर्यंत SDG (Sustainable Development Goal) अंतर्गत महाराष्ट्रद्वारे राज्यातील अर्भकमृत्यू दर १० पर्यंत खाली आणण्याचे उद्दिष्ट राज्य सरकारने निश्चित केलेले आहे. त्यानूसार सन २०१४ मध्ये अर्भक मृत्यू दर २२ होता. सद्यस्थित तो १९ पर्यंत खाली आला आहे.

(५) सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राज्यातील बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी पुढील उपाय योजना करण्यात येतात. - गरोदरपणातील संपूर्ण तपासणी व उपचार, संस्थात्मक प्रसुती, जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम, जननी सुरक्षा योजना, नियमित लसीकरण, नवजात काळजी कक्ष, एचबीएनसी व इन्टेनसिफाईड एचबीएनसी, जीवनसत्व “अ” व जंतनाशक मोहिम, बाल उपचार केंद्र, पोषण पुनर्वसन केंद्र, राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम, मानव विकास कार्यक्रमांतर्गत तज्ञांमार्फत मातांची व बालकांची तपासणी व उपचार, नवसंजीवनी कार्यक्रमांतर्गत मातृत्व अनुदान योजना, भरारी पथकामार्फत आरोग्य तपासणी व उपचार, दायी बैठक योजना इत्यादी.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागरी कमाल जमीन धारणा कायद्यांतर्गत मुंबई आणि ठाणे शहरात शासनास प्राप्त होणाऱ्या भूखंडाबाबत

**(७६) * १३५५०७ श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागरी जमीन कमाल धारणा कायदा सन २००७ मध्ये रद्द झाल्यानंतर शासनाने या कायद्यांतर्गत वाटप केलेले भूखंड ताब्यात घेतले नसल्याने या कायदयांतर्गत मुंबईत ७ हजार २० एकर आणि ठाणे शहरात १० हजार ५५२ एकर क्षेत्राचे भूखंड शासनास उपलब्ध होणार असून सद्यस्थितीत १००९ एकर क्षेत्राचे भूखंड शासनाकडुन संपादीत करण्यात आले असून उर्वरित भूखंड सध्या कॉर्पोरेट कंपन्या आणि विकासकांच्या ताब्यात आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार खासगी कॉर्पोरेट कंपन्या आणि विकासकांच्या ताब्यात असलेले भूखंड संपादीत करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) केंद्र शासनाच्या नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम, १९७६ मधील कलम २० अन्वये राज्यामधील नागरी समुहातील जमीनींना गृहबांधणी, तळेगाव दाभाडे भुखंड विकास योजना, कृषी व औद्योगिक प्रयोजनार्थ संपादनापासून सुट देण्यात आली आहे. परिणामी कलम २० च्या सुटीच्या आदेशातील अटी / शर्तींनुसार जमिनीचा विकास करणे योजनाधारकांवर बंधनकारक असुन, गृहबांधणी व तळेगाव दाभाडे भुखंड विकास योजना यामधून शासनास सदनिका/ भुखंडाच्या स्वरूपात शासनदेय क्षेत्र मिळणे अपेक्षित आहे.

केंद्र शासनाने उक्त अधिनियम निरसित केल्यानंतर राज्य शासनाने नाजकधा निरसन अधिनियम, १९९९ हा दि.२९.११.२००७ रोजी स्विकारला आहे. सदर निरसन अधिनियमानुसार कलम २० अन्वये मंजुर केलेल्या योजना व कलम १०(३)/१०(५) नुसार ताब्यात घेतलेल्या जमिनींना संरक्षण प्राप्त आहे.

उक्त अधिनियमाच्या वैधतेबाबत महाराष्ट्र चेंबर ऑफ हाऊसींग इंडस्ट्रीज व इतर यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेसमोर दाखल रिट याचिका क्र.९८७२/२०१० मध्ये मा.न्यायालयाने कलम २० खालील योजनेच्या

अटी व शर्ती योजनाधारकांवर बंधनकारक असल्याचा दिलेला निर्णय मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्र.२९००६/२०१४ मध्ये आव्हानित झाला असुन, मा.न्यायालयाने दि.१०.११.२०१४ रोजी योजनाधारकांवर कोणताही प्रतिकूल परिणाम होईल, अशी कारवाई (Coercive action) करु नये असे आदेश दिले आहेत.

उपरोक्त पार्श्वभुमीवर सन २०१६ च्या विधानमंडळाच्या पावसाळी अधिवेशनामध्ये उपस्थित लक्षवेधी सुचनेवर देण्यात आलेल्या आश्वासनानुसार गठीत करण्यात आलेल्या श्री.बी.एन.श्रीकृष्ण (मा.सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमुर्ती) व श्री.बी.एन.मखिजा (निवृत्त आय.ए.एस.) यांच्या द्विसदस्यीय समितीने सादर केलेला अहवाल व शासनाची भुमिका मा.सर्वोच्च न्यायालयास सिव्हील ॲप्लीकेशनद्वारे अवगत करण्यात आली असुन, सदरची बाब न्यायप्रविष्ठ असल्याने, मा.न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अलिबाग, कर्जत, पेण व खालापूर (जि.रायगड) या तालुक्यातील पशुवैद्यकीय दवाखान्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(७७) * १३८००५ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग, कर्जत, पेण व खालापूर (जि.रायगड) या तालुक्यांमधील पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या दुरूस्तीच्या ८ कामांसाठी १कोटी रूपयांच्या निविदा सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत मागविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पशु वैद्यकीय दवाखान्यांच्या दुरूस्ती कामांसाठी कार्यकारी अभियंता, विशेष बांधकाम विभाग, वरळी कार्यालयामार्फत दिनांक १६ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास ऑनलाईन निविदा प्रसिध्द करण्यात आली असून सदर निविदा उघडण्याचा दिनांक ५ सप्टेंबर, २०१८ होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासाठी मुंबईसह रायगड जिल्हयातील काही ठेकेदारांनी विहित कागदपत्रांसह निविदा दाखल केला परंतु इंटरनेटसह इतर तांत्रिक कारणे पुढे करून संपूर्ण निविदा प्रक्रिया अवैधरित्या रद्द करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करून या कामांसाठी तातडीने निविदा प्रक्रिया राबवून पशुवैद्यकीय दवाखान्यांचे कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) होय.

(३) अंशत: खरे आहे.

प्राप्त निविदाकारांपैकी निविदेतील अटीनुसार निविदाकार पात्र ठरत नसल्याने निविदा रद्द करण्यात आल्या.

(४) सदर कामाच्या पुनश्च: निविदा दिनांक ४/०१/२०१९ रोजी बोलावून निविदा प्रक्रिया पुर्ण करुन सदरची कामे प्रगतीपथावर आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## नांदेड जिल्हयातील शेतकऱ्यांना पिक विमा मंजुर करण्याबाबत

**(७८) * १३८५१८ श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयात सर्वाधिक दुष्काळी परिस्थिती असताना येथील धर्माबाद, नायगाव, मुखेड व उमरी तालुक्यात पीक विमा योजनेतून कापूस, सोयाबीन, उडीद, मुग,ज्वारी, तूर या पिकांना वगळण्यात आले असल्याचे दिनांक ३० एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असुन त्यामुळे येथील ५० टक्के शेतकरी येणाऱ्या खरीपाच्या पेरणीपासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, नांदेड जिल्हयात सन २०१८-१९ च्या खरीप हंगामासाठी १० लाख ९१ हजार शेतक-यांनी ४८ कोटी रुपयांची रक्कम विम्यापोटी कंपनीकडे भरलेली असतानाही तीव्र दुष्काळात शेतक-यांना फक्त १८ कोटी रुपयांचा विमा मंजूर करण्यात आला असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असुन, सदर विमा कंपनीकडून चुकीची आणेवारी काढून मंजूर झालेली विम्याची रक्कम शेतक-यांना वेळेत मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार सदरहू पिकांना विमा संरक्षण देण्यासह शेतकऱ्यांना सरसकट विमा मंजूर करण्याबाबत व चुकीची आणेवरी काढणाऱ्या विमा कंपनी विरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**डॉ. अनिल बोंडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत नुकसान भरपाई निश्चित करतांना पैसेवारी, दुष्काळ, टंचाई परिस्थिती आणि पुरामुळे झालेल्या नुकसानीसंदर्भात कोणत्याही शासकीय विभाग / संस्थेमार्फत घोषित करण्यात आलेली आकडेवारी ग्राह्य धरण्यात येत नसून सदर योजनेंतर्गत पीक कापणी प्रयोगांव्दारे प्राप्त होणाऱ्या पीकांच्या सरासरी उत्पन्नाच्या आकडेवारीची तुलना ही उंबरठा उत्पन्नाशी करुन नुकसान भरपाई निश्चित केली जाते.

प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगाम २०१८ मध्ये नांदेड जिल्हयात इफको टोकियो जनरल इंशुरन्स कंपनीमार्फत राबविण्यात आली. नांदेड जिल्हयातील १०.९३ लाख शेतकऱ्यांनी रु.४८.४९ कोटी इतका विमा हप्ता भरुन सदर योजनेत सहभाग घेतला होता. सहभागी शेतकऱ्यांपैकी ६० हजार शेतकऱ्यांना रुपये १८.६१ कोटी नुकसान भरपाई विमा कंपनीमार्फत निश्चित करण्यात आली असून, नुकसान भरपाई वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रेवस आवरे पोर्ट (ता.अलिबाग, जि.रायगड) प्रकल्पासाठी संपादीत केलेल्या जमिनी शेतकऱ्यांना परत करण्याबाबत

**(७९) * १३५६९८ श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेवस आवरे पोर्ट (ता.अलिबाग, जि.रायगड) प्रकल्पासाठी १९ वर्षापूर्वी शेतक-यांच्या जमिनी संपादीत केल्या असताना अद्यापी या प्रकल्पाला सुरवात झाली नसल्याने सदरच्या जमिनी परत देण्याच्या मागणीसाठी शेतकऱ्यांनी माहे मार्च, २०१९ मध्ये जिल्हाधिकारी, रायगड कार्यालयासमोर उपोषण केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमिनी शेतक-यांना परत करण्यासंदर्भात योग्य तो निर्णय घेण्यासाठी महसूल विभागाने विभागीय आयुक्त, कोकण व जिल्हाधिकारी, रायगड यांना तीन वर्षापूर्वीच आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार रेवस आवरे पोर्ट प्रकल्पासाठी संपादीत केलेल्या जमिनी शेतकऱ्यांना परत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) मे. रेवस पोर्ट लि. या कपंनीला विकास आयुक्त (उद्योग), मुंबई यांचे दिनांक ०४.१२.२००७ च्या आदेशान्वये रायगड जिल्हयातील अलिबाग तालुक्यातील रांजणखार डावली, मिळकतखार, कावडे, बेलपाडा, हशिवरे, बहिरीचा पाडा, रामकोठा, सोनकोठा, मानकुळे, फोफेरी, नारंगीखार व मांडवखार येथील जमिनी मल्टी प्रॉडक्ट विशेष आर्थिक क्षेत्र स्थापन करण्याकरीता खरेदी करण्यासाठी परवानगी देण्यात आलेली आहे. उक्त जमिनी सन २००७ ते २०१० या कालावधीत खरेदी केल्या आहेत. सदर जमिनी मुळ शेतकऱ्यास परत कराव्यात, या मागणीसाठी शेतकरी उपोषणास बसले होते.

(२) विभागीय आयुक्त, कोकण यांनी मार्च, २०१६ दरम्यान मे. रेवस पोर्ट लि. कंपनीने खऱ्याखुऱ्या औद्योगिक कारणासाठी खरेदी केलेल्या जमिनींबाबत महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ च्या कलम ६३ एक-अ मधील तरतुदी व त्यात वेळोवेळी झालेल्या सुधारणा विचारात घेऊन कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

(३) व (४) सदर जमिनींचा खराखुरा औद्योगिक वापर न केल्याने महाराष्ट्र कुळवहीवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ चे कलम ६३एक-अ अन्वये सुनावणीची प्रक्रिया चालू असून, प्रकरण अर्धन्यायिक प्रक्रियेत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बीड जिल्ह्यात अवैधरित्या महिलांच्या गर्भपिशवी काढण्याच्या शस्त्रक्रिया झाल्याबाबत

**(८०) * १३५४९६ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यात मागील तीन वर्षात १०१ रुग्णालयांमध्ये सुमारे ४६०५ महिलांची गर्भपिशवी काढण्याची शस्त्रक्रिया झाल्याची माहिती आरोग्य विभागाच्या अहवालातून निदर्शनास आली असुन आरोग्य विभागाच्या

समितीने याची चौकशी केली असता जिल्ह्यातील १० रुग्णालयांमध्ये दीड हजारापेक्षा जास्त शस्त्रक्रिया झाल्या असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉक्टरांनी महिला रुग्णांना विविध आजारांची भिती दाखवून त्यांच्या गर्भ पिशव्या काढण्याची शस्त्रक्रिया करुन रुग्णांकडून प्रत्येकी ५० हजार रुपये शस्त्रक्रियेसाठी घेतले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शल्यचिकित्सक डॉ. अशोक थोरात व डॉ आय व्ही. शिंदे यांच्या नेतृत्वाखाली चौकशी समिती गठीत करुन शासनास अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार संबंधित रुग्णालयांवर व दोषी डॉक्टरांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) अंशतः खरे आहे.

जिल्हा शल्य चिकित्सक यांनी प्रस्तुत प्रकरणाची चौकशी करण्यासाठी समिती गठित केली होती. या समितीने सादर केलेल्या अहवालावरुन महिला रुग्णांकडून प्रत्येकी रुपये ५०,०००/- एवढी रक्कम घेतली असल्याचा उल्लेख प्राप्त माहितीमध्ये दिसून आला नाही.

(४) जिल्हाधिकारी बीड यांनी दि.१६.४.२०१९ च्या पत्रान्वये जिल्हयातील सर्व ग्रामीण/उपजिल्हा/स्त्री रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक, खाजगी रुग्णालय व नर्सिंग होमचे वैद्यकीय व्यवसायिक यांना हिस्टरेक्टॉमीबाबत नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सुचना दिल्या. तसेच अशी शस्त्रक्रिया कोणत्या परिस्थितीत करणे आवश्यक आहे व त्याचे रुग्णांच्या आरोग्यावर काय दुष्यपरिणाम होतात याबाबतही सर्व रुग्णालयात सूचना फलक लावण्याच्या सूचना दिल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धामनगाव रेल्वे (जि.अमरावती) तालुक्यात समृद्धी महामार्गाच्या बांधकामासाठी मुरूम व मातीचे अवैध उत्खनन करण्यात येत असल्याबाबत

**(८१) * १४०६३२ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धामनगाव रेल्वे (जि.अमरावती) तालुक्यातील समृद्धी महामार्गाच्या बांधकामाचे कंत्राट एनसीसी या कंपनीला दिले असून कंपनीने रस्त्यासाठी मुरूम व माती पुरवण्याचे काम उप कंत्राटदारांना दिले आहे. सदर उप कंत्राटदार माती व मुरूमांचे अवैध उत्खनन करीत असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उपकंत्राटदार रात्रभर ट्रकच्या सहाय्याने मुरुमाचे अवैध उत्खनन करीत असल्याबाबतच्या तक्रारी संबंधित गावांमधील लोकांनी केल्यानंतर उप कंत्राटदाराने तक्रार करणाऱ्या शेतकऱ्यांना जीवे मारण्याची धमकी तसेच प्रयत्न केला असल्याचे व तरीही याबाबत प्रशासनाने दाखल घेतली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तळणी रेल्वे (ता.धामनगाव रेल्वे) येथील शेतकरी श्री.अनंत तवर व गावकऱ्यांनी काळाशी परिसरात होत असलेल्या अवैध उत्खननाची लेखी तक्रार जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी यांच्याकडे केली असताना या तक्रारीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्यामुळे तक्रारकर्त्याने उपोषणाचा इशारा दिला असता त्यांच्या मुलाला काळाशी तळणी मार्गावर जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून मुरुम व मातीचे अवैध उत्खनन करणाऱ्या सदर उप कंत्राटदारावर व या प्रकरणातील संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशी बाब निदर्शनास आली आहे.

(२) अवैध उत्खननाच्या तक्रारी करणाऱ्या ग्रामस्थांना/शेतकऱ्यांना उपकंत्राटदाराने जीवे मारण्याची धमकी तसेच प्रयत्न केला असल्याबाबतचे तक्रार वजा निवेदन जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झाले नाही.

(३) श्री.शुभमसिंह अनंतसिंह तंवर, मौजे तळणी रेल्वे या व्यक्तीने दि.३०/४/२०१९ रोजी मौजे कळाशी परिसरात होत असलेल्या अवैध उत्खननाबाबत लेखी तक्रार जिल्हाधिकारी, अमरावती यांचेकडे केली होती. तसेच श्री.तंवर हे मौजे तळणी येथे दि.७/५/२०१९ रोजी उपोषणास बसून त्यांनी दि.८/५/२०१९ रोजी उपोषण मागे घेतले. तक्रारदार/उपोषणकर्ते यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची तक्रार प्राप्त झाली नाही.
(४) प्रश्नाधीन अवैध उत्खनन प्रकरणी प्राप्त तक्रारीनुसार उत्खननाच्या ठिकाणी गौण खनिजाच्या उत्खननाचे मोजमाप करुन संबंधित कंत्राटदार यांचेवर दंडात्मक कारवाई करण्याचे प्रस्तावित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील वाढत्या अस्थमा रोगावर उपाययोजना करण्याबाबत

**(८२) * १३५१९६ ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मागील वर्षभरात अस्थमा झालेल्या बाल रुग्णांच्या संख्येत तीन हजारांनी वाढ झाली असुन केंद्रीय आरोग्य विभागाच्या अहवालानुसार अस्थमा झालेल्या बालकांची संख्या सन २०१७-१८ मध्ये ४१८५ तर सन २०१८-१९ मध्ये ७४१७ अशी असून अस्थमाचे प्रमाण सन २००८ मध्ये ५.५ टक्के तर सन २०१८ मध्ये १५ टक्के असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शून्य ते पाच वयोवटातील बालकांमध्ये अस्थमाचे प्रमाण वाढत असुन मुंबईत २३६८, पुण्यात १३१७, नाशिक ५६१ तर पालघरमध्ये ५४७ इतक्या लहान बालकांना अस्थमा असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, श्वसनाशी संबंधित विविध प्रकारच्या संसर्गामुळे व वातावरणातील विषाणू घटकांमुळे या आजारात वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अस्थमावर नियंत्रण मिळवण्यासह अस्थमा झालेल्या लहान बालकांवर औषधोपचार सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

आरोग्य व्यवस्थापन माहिती प्रणाली (HMIS) नूसार सन २०१७-१८ या वर्षात एकूण ४१८५ व सन २०१८-१९ मध्ये ६८८६ इतक्या बालकांना अस्थमा असल्याचे निदर्शनास आले आहे. Health Management Information System (HMIS) अहवालावरुन अस्थमा असलेल्या बालकांची डाटा एन्ट्री करण्यात येत असल्यामुळे ही संख्या दिसते.
(२) हे अंशत: खरे आहे.

मे २०१९ अखेर Health Management Information System (HMIS) नूसार ० ते ५ वयोगटातील मुंबई मध्ये २४०१, पुण्यात ११२१, नाशिकमध्ये ३८७ व पालघरमध्ये ४८५ इतक्या बालकांना अस्थमा असल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) वातावरणातील विविध घटकांमुळे एलर्जी होण्याची शक्यता असून त्या घटकांमध्ये वाढ झाल्यास परिणामी एलर्जीमुळे झालेल्या Bronchial Asthma या आजाराच्या रुग्ण संख्येमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे.
(४) राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत आंगणवाडीतील ० ते ६ वयोगटातील बालकांचे व तसेच शाळेतील ६ ते १८ वयोगटातील मुला-मुलींची तपासणी करण्यात येते. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये ० ते ६ वयोगटातील एकूण ६०,७३,५४२ बालकांची तपासणी केली त्यापैकी Reactive Airway Disease या आजारांतर्गत एकूण २३२३३ (०.४३%) बालकांना उपचार देण्यात आला आहे. तसेच विविध आरोग्य संस्थांमध्येही वैद्यकीय अधिकारी यांच्यामार्फत निदान करुन उपचार केले जातात व त्यासाठी आवश्यक औषधे उपलब्ध करुन दिली जातात.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोंढवे-धावडे व न्यू कोपरे (ता.हवेली, जि.पुणे) येथे प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु करण्याबाबत

**(८३) * १३७१४६ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोंढवे-धावडे व न्यू कोपरे (ता.हवेली, जि.पुणे) येथे ५० हजारापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या गावात प्राथमिक आरोग्य केंद्र नसल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागरिकांना १७ कि.मी. अंतरावरील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी जावे लागत असल्यामुळे योग्य वेळेत उपचार न मिळाल्याने एका तरुणाचा डेंगीने मृत्यू झाल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोंढवे-धावडे व न्यू कोपरे येथे प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हवेली तालुक्यातील ११ गावांचा समावेश पुणे महानगरपालिकेमध्ये झाला असल्याने याठिकाणच्या उपकेंद्राचे स्थलांतर कोंढवे-धावडे व न्यू कोपरे येथे करण्याची कार्यवाही सुरु आहे. त्याचप्रमाणे सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारीत रुग्णालय सुरु करण्यासाठी जोड बृहत आराखडा तयार करण्यात येत असून कोंढवे-धावडे व न्यू कोपरे येथे प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु करण्याची मागणी निकषानुसार जोड बृहत आराखड्यामध्ये समाविष्ट करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे आवरे, कडापे (ता.उरण, जि.रायगड) येथील जमीन रिलायन्स महामुंबई एसईझेडला विक्री केल्याबाबत

**(८४) * १३६३९८ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे आवरे, कडापे (ता.उरण, जि.रायगड) येथील सावकाराने शेतकऱ्यांची ३०० एकर जमीन परस्पर रिलायन्स महामुंबई एसईझेडला विक्री केल्याच्या निषेधार्थ शेकडो शेतकऱ्यांनी दिनांक १८ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास तहसिलदार, उरण यांच्या कार्यालयावर मोर्चा काढुन आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वी कुळांनी सुरु केलेल्या उपोषणामुळे तहसिलदारांनी कुळांची नावे ७/१२ उताऱ्यावर नोंद करण्याचे आदेश दिले असताना माहे मे, २०१० मध्ये वा त्यासुमारास कुळाची कोणतीही परवानगी न घेता व त्यांना मोबदला न देता या जमीनींची ताबे पावती रिलायन्सच्या नावे करण्याचे आदेश तहसिलदारानी दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार सदर जमीन त्वरीत कुळांच्या नावे करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच माहे मे २०१९ अखेरपर्यंत ३०० एकर पैकी एकूण किती एकर जमीन मुळ शेतकऱ्यांना प्रत्यार्पित करण्यात आली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील ग्रामीण भागातील खड्डे भरण्याच्या कामात झालेली अनियमितता

**(८५) * १३६४७५ श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील ग्रामीण भागातील पावसाळी व उन्हाळी खड्डे भरण्याच्या कामात सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी व ठेकेदार यांनी संगनमताने लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यावरील खड्डे मातीने भरले असून सदर कामाची चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करून दोषींवर शासनाने कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, लोकप्रतिनिधींच्या तक्रारीच्या अनुषंगाने सबंधित ठेकेदार व अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) होय, स्थानिक लोकप्रतिनिधींचे पत्र माहे फेब्रुवारी २०१९ मध्ये विभागास प्राप्त झाले आहे.

(३) भिवंडी तालुक्यातील प्रजिमा व रा.मा. दर्जाच्या रस्त्याचे सन २०१७-१८ व सन २०१८ -१९ या व्दिवार्षिक दुरुस्तीमध्ये पावसाळयात खडीने व पावसाळयानंतर डांबराने खड्डे भरणे, माती भराव पुर्नबांधणी, मोऱ्या व पुलांची दुरुस्ती, साईड पट्टी पुर्नबांधणी, रंगकाम इ. कामे निविदा शर्तीनुसार व मंजूर अंदाजपत्रकानुसार ठेकेदाराकडून करण्यात आलेले आहे व सदरचे रस्ते सुस्थितीत ठेवण्यात आलेले आहे. सदर कामांची पाहणी गुणनियंत्रण व दक्षता पथक यांचेमार्फत करण्यात आलेली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील दुष्काळी स्थितीवर प्रभावी उपाययोजना करण्याबाबत

(८६) * १३४८८५ श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.बसवराज पाटील (औसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.हरीभाऊ जावळे (रावेर), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), ॲड.आकाश फुंडकर (खामगांव), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्रीमती स्नेहलता कोल्हे (कोपरगाव), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली),

**श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १५१ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला असुन सुमारे २८५२३ गावांमध्ये दुष्काळी परिस्थिती असून शेतीच्या पाण्यासह जनावरांचा चारा व पाण्याची समस्या निर्माण झाली असताना शासनाने गावनिहाय चारा छावण्यांची व्यवस्था करण्यात येईल अशी घोषणा करूनही सद्यस्थितीत सुमारे ८२ लाख जनावरांना चाऱ्याची गरज असल्याचे दिनाक १० एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सद्य:स्थितीत सुमारे ८६९ छावण्यांद्वारे साडेपाच लाख जनावरांना चारा दिला असून उर्वरित जनावरांना मुबलक चारा मिळत नसल्यामुळे माहे फेब्रुवारी व मार्च, २०१९ या महिन्यांमध्ये दुध संकलन सुमारे २४ लाख लिटरने कमी झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र शासनाने दुष्काळी व्यवस्थापन संहितानुसार (२०१६) दुष्काळाचे निकष निश्चित केले असून वनस्पती निर्देशनासाठी तालुका हा निकष ग्राह्य धरुन मृद, आद्रता, पर्जन्यमापन महसुली मंडळ स्तरावर करणे व पिक पाहणी इत्यादी निकषांचा विचार करुन दुष्काळ जाहिर करण्यात आला असल्याने केंद्र शासनाकडून दुष्काळ निवारणासाठी अत्यंत तुटपूंजी मदत मिळणार असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात दुष्काळावर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी किती कोटी रुपयांच्या निधीची मागणी शासनाने केंद्र शासनाकडे केली असुन त्यापैकी किती आर्थिक मदत राज्य शासनाला मिळाली व किती अद्याप बाकी आहे, तसेच राज्य शासनाकडून दुष्काळ निवारणासाठी किती निधीची तरतूद केली आहे,

(५) असल्यास, राज्यातील दुष्काळ परिस्थितीची पाहणी करुन शेतकऱ्यांना दुष्काळ अनुदान मदतनिधी तातडीने मिळवून देण्यासह जनावरांसाठी पुरेसा चारा उपलब्ध होण्यासाठी गावनिहाय चारा छावण्या सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) राज्यातील दुष्काळ जाहिर केलेल्या १५१ तालुके व २६८ महसूली मंडळामध्ये लहान व मोठी अशी एकूण १,३३,३१,१२३ जनावरे व ८१,४७,१२५ शेळ्या मेंढ्या असून, यांचेसाठी चा-याची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आलेले आहे.
(२) राज्यात दूधासाठी सप्टेंबर ते मार्च हा कालावधी पुष्टकाळ असतो. तसेच मार्च ते सप्टेंबर हा कृशकाळ असतो. दूधाच्या पुष्टकाळात दूध उत्पादनात वाढ होणे व कृशकाळात दूध उत्पादनात घट होणे हे नैसर्गिक आहे.

माहे डिसेंबर, २०१८ मध्ये प्रति दिन १३८.८६१ लक्ष लिटर दूध संकलित होत होते. हेच फेब्रुवारी, २०१९ मध्ये प्रतिदिन १३८.६६१ लक्ष लिटर व मार्च, २०१९ मध्ये १३५.९१९ लक्ष लिटर प्रतिदिन संकलित झाले आहे. त्यामुळे प्रश्नात नमूद केल्यानुसार फेब्रुवारी व मार्च, २०१९ मध्ये २४ लक्ष लिटर दूध संकलन कमी झाले आहे अशी वस्तुस्थिती नाही.
(३) हे खरे नाही.
(४) राज्य शासनाने कृषीविषयक नुकसान, पिण्याचा पाण्याचा पुरवठा व चारा यासाठी रूपये ७९६२.६३ कोटी इतक्या रकमेचे मदतीचे ज्ञापन केंद्र शासनास पाठविले होते. त्यानुसार केंद्र शासनाने राज्य शासनास राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीमधून रूपये ४५६२.८८ कोटी इतका मदत निधी मंजूर केला आहे. यापैकी रू.४२४८.५९ कोटी इतका निधी राज्यास प्राप्त झाला आहे व रू.३१४ कोटी अद्याप बाकी आहे. अर्थसंकल्पात रू.४४७३.१७ कोटी इतकी तरतूद केली आहे.

(५) महसुल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक २५ जानेवारी, २०१९ अन्वये दुष्काळ जाहिर केलेल्या भागात जनावरांच्या चारा छावण्या सुरू करण्यात आल्या आहेत. सद्यस्थितीत राज्यात १६३५ छावण्या सुरू असून सुमारे ११,००,००० जनावरे दाखल आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.